बिसेन डेन्टल केअर
डॉ.दिप(पंकज) बिसेन डॉ.खुशबू बिसेन(पटले)
दंत व मुख रोगविशेषज्ञ
बी.डी.एस.(नागपूर)
ताज मेरीप्लेक्स, गर्ल्स कॉलेज रोड गोंदिया
सकाळी:- ११ ते ३ सायं ६ ते ९ वाजेपर्यंत संपर्क:- ९५४५६८१८७०

साप्ताहिक http://berartimes.com

# बेरार टाईम्स

मुख्य संपादक :- खेमेंद्र कटरे, सहसंपादक :- सुरेश भदाडे




गोंदिया शहरात बेरार टाईम्सचा अंक चौरसिया पान सेंटर जयस्तंभ चौक गोंदिया येथे उपलब्ध

आर.एन.आय.क्र. एमएएचएमएआर/२०११/४६५१० | वर्ष -१३ गोंदिया | अंक ०८ | बुधवार, दि.३१ जानेवारी २०२४ | पृष्ठ-४ | किंमत-३ रुपये | Postal Reg.No.NPMFL/107/2022-2024

# कार्यकारी अभियंता म्हणाले,आम्ही काय लोकप्रतिनिधींच्या मागे मागे फिरायाचे?

**गोंदिया:** शासकीय कार्यालयात जर लोकप्रतिनिधींसोबतही अधिकारी मुजोरी करीत असतील तर सर्वसामान्यांचे काय हाल असतील, याची कल्पनाही न केलेलीच बरी. अधिकाऱ्यांच्या मुजोरीचा अनुभव देवरीचे आमदार सहषराम कोरेटेंना आला आहे. २९ जानेवारीला आमगाव-देवरी क्षेत्राचे आमदार सहषराम कोरोटे यांनी खुद्द बांधकाम विभागाच्या कार्यकारी अभियंता कार्यालयात अधिकाऱ्यांचा मुजोरपणा अनुभवला आहे.



जिल्ह्यात यंत्रणेतील अधिकांऱ्यांची बेबंदशाही कोणत्या स्तरावर पोहचली आहे,याचा हा उत्तम नमुना आहे.आमदार सहषराम कोरोटे काही भाजपच्या कार्यकर्यांसोबत बांधकाम विभागाच्या कार्यालयात पोहोचले. दरम्यान एका वरिष्ठ अधिकाऱ्याला कामांबाबत विचारणा केली. मात्र आपल्या कक्षात आलेल्या जनप्रतिनिधीला शिष्टाचाराचा परिचय न देणाया अधिकाऱ्याला लोकप्रतिनिधीला मान सन्मान देण्याचाही विसर पडल्याचे चित्र होते.आमदारांना बसण्याची विनंती करण्यात आली नाही,उलट अमुक-तमुक कर्मचाऱ्यांच्या टेबलावर हे प्रलंबित आहे, असे सांगण्यात आले.

दरम्यान आमदार खुद्द कामांचा पाठपुरावा घेण्यासाठी संबंधित कर्मचाऱ्यांच्या टेबल ते टेबल फिरत राहिले. तरीही त्या उपअभियंत्याला जनप्रतिनिधीला मान देण्याची माणुसकी सुचली नाही.जिल्ह्यात शासकीय यंत्रणेतील लालफित शाहीतील अधिकाऱ्यांच्या मुजोरपणा कोणत्या स्तरावर पोचला आहे, याचीही अनुभूती आमदार कोरोटे यांनी घेतली.

उल्लेखनीय असे की, आमदारांनी या प्रकाराबाबत संबंधित अधिकाऱ्याशी चर्चा केली असता, उलट प्रतिउत्तरातूनही त्यांनी उर्मटपणाचा परिचय दिला. दरम्यान याची तक्रार आता मंत्रालय स्तरावर करणार असून आपल्याला मिळालेल्या वागणुकीची तक्रार विधानसभा अध्यक्षांकडे करणार असल्याची माहिती काँग्रेसचे आमदार सहषराम कोरोटे यांनी दिली.

विशेष म्हणजे आमदार कोरेटेंनीही आपल्या लोकप्रतिनिधी पदाचा मान ठेवत आपल्या कंत्राटदार कार्यकर्त्यासोबंत टेबल ते टेबल फिरुन विचारण्यापेक्षा कार्य.अभियंत्यांचे कक्ष बंद असले तरी मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या कक्षात बोलावून काय तो जाब विचारायला हवा होता.परंतु त्यांना या विभागातील अनुभव कसा असतो हे बघायचे होते अशा शब्दात त्यांनी भावना व्यक्त करीत अधिकारी-कर्मचारी मुजोर झाल्याचे त्यांनी बेरार टाईम्सला सांगितले.

आमदार कोरेटे हे कार्यालयात फिरत असताना कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय मात्र कुलूप बंद होते. त्यामुळे आमदारांना परत जावे लागले.

बांधकाम विभागात आमदार टेबल ते टेबल फिरत आहेत,ते लोकप्रतिनिधी असून त्यांना आपल्या अधिनस्थ उपअभियंता व कर्मचारी यांनी मान द्यायला नको का हा प्रश्न कार्यकारी अभियंता अतुल मेश्राम यांना विचारले असता आमदारांच्या मागे मागे आम्ही फिरायचे काय, असे म्हणत कंत्राटदारांसोबत ते कशासाठी टेबल ते टेबल फिरतात, त्यांना लोकप्रतिनिधी आपण आहोत हे कळत नाही का असे उलट प्रतिउत्तर देत कार्यालयात खुर्चीवर ठाण मांडून बसलेल्या उपअभियंत्याची बाजू सावरण्याचा प्रयत्न त्यांनी केला.

# धान उत्पादक सानुग्रह अनुदानाच्या प्रतीक्षेत घोषणा झाली,जीआरच निघेना

**गोंदिया:** धान उत्पादकांना सानुग्रह अनुदान (बोनस) देण्याची घोषणा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी १८ डिसेंबर रोजी नागपूर येथे विधिमंडळाच्या सभागृहात केली. घोषणा होऊन महिना लोटला असतानाही सानुग्रह अनुदान संदर्भातील शासन निर्णय निर्गमित झाला नसल्याने, बोनस कधी मिळणार? असा प्रश्न धान उत्पादकांकडून उपस्थित केला जात आहे.



## शेतकऱ्यांमध्ये संभ्रमावस्था

**गतवर्षी राज्य शासनाने आभासी नोंदणी केलेल्या सर्व शेतकऱ्यांना सानुग्रह अनुदान दिले होते. यंदाच्या हंगामात केंद्रावर धान विक्री करणाऱ्या शेतकऱ्यांनाच सानुग्रह अनुदानाचा लाभ मिळणार असे वक्तव्य जिल्ह्याचे पालकमंत्री धर्मराव आत्राम यांनी एका कार्यक्रमात केल्याने शेतकऱ्यांमध्ये संभ्रमावस्था निर्माण झाली आहे. असे झाल्यास हजारो शेतकरी सानुग्रह अनुदानाला मुकणार, हे मात्र निश्चित!**

सततची अस्मानी संकटे व अल्प हमीभावामुळे दरवर्षी धानाला बोनसची मागणी होते. मुख्यमंत्र्यांनी दोन हेक्टरच्या मर्यादेत हेक्टरी २० हजार रुपये बोनस जाहीर करुन आश्वासनाची पूर्ती केली होती. अनुदान राशीचा गोंदिया जिल्ह्यातील दीड लाखावर शेतकऱ्यांना लाभ मिळणार आहे. गतवर्षीही २ हेक्टरच्या मर्यादेत ३० हजार रुपये बोनस शिंदे सरकारने दिला होता. यंदा यात १० हजार रुपयांनी वाढ करण्यात आली. २ लाख २० हेक्टर आर लागवड क्षेत्रापैकी तब्बल १ लाख ९० हजार हेक्टर आर क्षेत्रात धानाची लागवड केली जाते. केंद्र शासनाच्या हमीभाव योजनेअंतर्गत गोंदिया जिल्ह्यात गैर आदिवासी भागात जिल्हा पणन अधिकारी कार्यालय व आदिवासी भागात आदिवासी विकास महामंडळाच्या उपभिकर्ता संस्था धान खरेदी करतात.

धान खरेदीची संपूर्ण प्रक्रिया आभासी आहे. गोंदिया जिल्ह्यात २ लाख ७२ हजार शेतकरी संख्या आहे. पैकी धान विक्रीसाठी १ लाख ५८ हजार ६३५ शेतकऱ्यांनी नोंदणी केली आहे. ८९ हजार ९४१ शेतकऱ्यांनी २९ लाख ५५ हजार २१७ क्विंटल धान विक्री केले आहे. नोंदणी केलेल्यांपैकी ६८ हजार ६९४ शेतकऱ्यांनी अद्यापही केंद्रावर धान विक्री केलेली नाही. विक्रीची मुदत ३१ जानेवारी रोजी संपत आहे. दोन दिवसांत ६८ हजार शेतकऱ्यांकडून धान खरेदी होईल काय? असा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यातच अद्यापही हजारो शेतकऱ्यांना धान विक्रीची रक्कम मिळालेली नाही. सानुग्रह अनुदानाची घोषणा होऊन महिना लोटला असताना जीआरएस निघाला नाही तर अनुदान कधी मिळणार? असा प्रश्न शेतकरी उपस्थित करीत आहेत.

# ११२९ गुरुजींच्या आधारचे जुळेना तारतम्य

## प्रशासन झाले हतबल: ३९ हजार विद्यार्थ्यांचाही प्रश्न ऐरणीवर



**गोंदिया:** शासनाने प्रत्येक क्षेत्रात आधारकार्ड अनिवार्य केले. त्याशिवाय कुठलेही काम होत आहे. प्रत्येकाडे ते आहेतच. मात्र जिल्हा परिषदेसह विविध विभागांच्या शाळांमध्ये कार्यरत गुरुजींचे आधारकार्ड संलग्न होत नसल्यामुळे शासन आणि प्रशासनाची डोकेदुखी वाढली आहे. वारंवार सुचना करुनही १,१२९ गुरुजींचे आधार संलग्न होण्यास नानाविध अडचणी येत आहेत. त्यामुळे आता करावे तरी काय? असा सवाल उपस्थित होत आहे.

आधार म्हणजे देश पातळीवर प्रत्येकाला देण्यात आलेले स्वतंत्र ओळखपत्र आहे. त्याला युनिक आयडी असेही संबोधण्यात येते. प्रत्येक बाबींकरिता सर्वोच्च ओळखपत्र म्हणून आधार कार्डकडे बघितले जाते. येत्या काही महिन्यात शिक्षकांची संख्या निश्चिती होणार आहे. संचमान्यता त्याच आधारावर दिली जाणार आहे. त्यासाठी शासनाच्यावतीने विद्यार्थी आणि शिक्षकांना आधार कार्ड अपलोड करण्याच्या सुचना केल्या. जिल्ह्यात विविध विभागाच्या शाळांमध्ये एकूण ८ हजर ५३२ शिक्षक कार्यरत आहेत. त्यातील ४ हजार ४०३ शिक्षकांचे अधारकार्ड अपलोड करण्यात आले. तर २ लाख २८ हजार ९०७ विद्यार्थी शिक्षण घेत असून त्यातील १ लाख ९२ हजार ४२४ विद्यार्थ्यांचे आधारकार्ड अपलोड करण्यात आले आहेत. त्यातील ३६ हजार ४८३ विद्यार्थी आणि १,१२९ शिक्षकांचे आधारकार्ड अद्यापही अपलोड करण्यात आलेले नाही. त्यामुळे येत्या काळात होणारी संचमान्यता कणे कठीण जाणार आहे. तातडीने शिक्षक आणि विद्यार्थ्यांचे आधारकार्ड अपलोड करण्याच्या सुचना वारंवार शिक्षण विभागाकडून देण्यात आल्या. परंतु आधार अपलोड करताना विविध त्रुटी दाखविण्यात येत आहेत. परिणामी आधार अपलोड करताना शिक्षकांना घाम फुटला आहे. इकडे आड आणि तिकडे विहिर अशी स्थिती शिक्षकांसमोर आहे. शिक्षण विभागाने आधार अपलोड न करणाऱ्या शिक्षकांवर कारवाई करण्याचा इशारा दिल्यामुळे शिक्षकांच्या चिंतेत अधिकच भर पडली आहे.

## आधार तर आहेच ना?

**आज प्रत्येकाकडे आधारकार्ड आहे. बँक आणि इतर व्यवहारासाठी आधार कार्ड वापरले असताना शासनाच्या साईटवरच आधार अपलोड का करता येत नाही. असा सवाल यानिमित्त उपस्थित होत आहे. दुसरीकडे आधी टाकण्यात आलेल्या माहितीत काही अक्षरचुक झाल्यामुळे वेबसाटईवर आधार अपलोड होत नाही. अशी शिक्षकांची ओरड आहे. अशातच शिक्षकांमध्ये संभ्रमाची स्थिती निर्माण झाली आहे.**

# मनरेगातील भ्रष्टाचारावर बिडीओचे पांघरुन

- पांढराबोडी,लोहारा व मुरपारच्या कामाची चौकशी संशयास्पद
- पाच महिने लोटूनही मुख्यमंत्री व आयुक्ताच्या पत्राला केराची टोपली

**गोंदिया:-** केंद्र व राज्य सरकारची राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना मजुरांसाठी महत्त्वपूर्ण ठरत आहे. ही योजना पहिल्यांदा दुष्काळग्रस्त गावात व जिल्ह्यात राबविली जात होती. पण केंद्र सरकारने कायदा तयार करुन ही योजना सर्वत्र लागू केली. रस्ते, पांदन रस्ते, नाला सरळीकरण, तलाव खोलीकरण, वृक्ष लागवड, घरकुल, जनावरांचे गोठे, कुकुट पालन शेड, सिमेंट रस्ते, शेततळे, रोपवाटीका, नाली अनेक कामे केली जातात.



मात्र गोंदिया तालुक्यात सुरू असलेल्या या सर्व कामांमध्ये मोठ्या प्रमाणात अनियमितता असून मग्रारोहोयच्या नियमांना हरताळ फासण्याचे काम ग्रामपंचायतीचे सरपंच व अभियंत्याच्या माध्यमातून सुरु आहे.. तालुक्यातील पांढराबोडी, लोहारा व मुरपार येथील मनरेगाच्या पांदन रस्ता व सिमेंट रस्ता बांधकामात अनियमितता व कामाची गुणवत्ता नसल्याची तक्रार मुख्यमंत्र्यांसह मनरेगाव आयुक्तांना करण्यात आली. त्या तक्रारीला पाच महिने लोटूनही मनरेगाव उपजिल्हाधिकारी, मनरेगा बिडीओ व गोंदिया पंचायत समितीच्या बिडीओंनी इमाने-इतबारे लक्ष न दिल्याने चौकशी गुंडाळण्यात आली आहे.

या निकृष्ठ व नियमबाह्य कामाची तत्काळ चौकशी न करता कंत्राटदार व अभियंत्याच्या चुकीच्या कामांना पाठबळ देण्याचे काम या अधिकाऱ्यांनी केले असून माहिती अधिकार कायद्यात ही केलेल्या चौकशीचा अहवाल प्रशासन देवू शकलेले नाही. त्यातच कंत्राटदार, ग्रामपंचायत पदाधिकारी यांना सोबत घेवून थातुर-मातुर चौकशी करुन विस्तार अधिकारी आपले हात झटकण्याचा प्रयत्न या प्रकरणात करित असल्याची माहिती समोर आली आहे. मनरेगाव आयुक्तांनी उपजिल्हाधिकारी मनरेगाव यांना एकदा नव्हे तर दोनदा स्मरण पत्र दिले. उपजिल्हाधिकारी मनरेगाने बिडीओंना स्मरण पत्र दिले.तर मनरेगाव बिडीओंने गोंदिया पंचायत समितीच्या बिडीओला स्मरण पत्र दिले. हा स्मरण पत्राचा खेळ पाच महिन्यापासून सुरु असतानाही गोंदिया पंचायत समितीच्या बिडीओंना मात्र कुठल्या लोकप्रतिनिधीची भिती की त्या कामाची चौकशी व गुणवत्ता तपासणी करण्याकडे दुर्लक्ष केले हे कळायला मार्ग नसून गोंदिया पंचायत समिती अंतर्गत मनरेगामधील विविध कामे सोबतच अभिसरणातील रस्ता बांधकाम, गोदाम बांधकाम यामध्ये होत असलेल्या भ्रष्टाचारावर पांघरुन घालण्याचे कामच तक्रारीनंतरही सुरु असल्याने केंद्र सरकारच्या या योजनेला गोंदिया पंचायत समितीने मात्र "आवो हम सब मिलकर लुटे मनरेगा को' अशी योजना करुन ठेवली आहे.

विशेष म्हणजे या योजनेतंर्गत गावातीलच मजुरांना काम मिळणे अपेक्षित असतांना ग्रामपंचायत स्वतःच काम करीत असल्याचा देखावा करीत पेटी कंत्राटदाराच्या माध्यमातून मग्रारोहयोंतर्गतच्या पांदण रस्ता बांधकामावर बाहेरील गावातील मजुरांना लोहारा व पांढराबोडी येथे आणले होते.

या कामावर बाहेरील गावच्या मजुरांना का असा प्रश्न उपस्थित केल्यावर मात्र गावातील मजुरांना हे काम येत नसल्याचे कारण काम करीत असलेला पेटीकंत्राटदार सांगायला विसरत नाही. लोहारा येथील पांदण रस्ता कामावर तालुक्यातीलच किन्ही येथील मजुरांना आणले गेले, त्यावर सरपंच ढेकवार यांनी सदर काम आपण स्वतःकरीत असल्याचे कबुल करीत आपण स्वतः त्या मजुरांची मजुरी देणार असल्याचे साांगितले. मात्र ग्रामपंचायतीच्यावतीने नमुना ४ अंतर्गत कुठलाही प्रस्ताव बाहेरील गावातील मजुरांना लोहारा येथे आणण्याकरीता घेतला नसल्याचेही सांगितले. या कामाच्या गुणवत्तेबद्दल विचारणा केल्यावर मात्र स्पष्ट न बोलता उडवाउडवीची उत्तरे दिली.

अशाच प्रकार तालुक्यातील पांढराबोडी येथील दोन पांदण रस्ता बांधकामावर बघावयास मिळाले. पांढराबोडीचे सरपंच दमाये यांनी सदर दोन्ही काम पंचायत समितीचे सदस्य भुवन लिल्हारे व योगेश दमाहे करीत असल्याचे सांगितले. लिल्हारे करीत असलेल्या पांदण रस्ता कामावर सुध्दा लोहारासारखेच किन्ही येथील मजुरांना कामावर ठेवण्यात आले. त्यांचे मस्टरची नोंद माात्र ग्रामरोजगारसेवकाने केले नसल्याचे समोर आले होते.

ग्रामपंचायत ही एजंसी असली तरी सचिवांचा कुठेच लक्ष नाही. तर सरपंच हे आपल्या मर्जीने काम करीत असल्याने पांदण रस्ता बांधकामाच्या गुणवत्तेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

दरम्यान लोहारा व पांढराबोडी येथील कामाच्या गुणवत्ता व अंदाजपत्रकाबद्दल तत्कालीन अभियंता विनोद धावडे व योगेश धावडे यांना विचारणा केल्यावर अंदाजपत्रक दाखविण्यास नकार दिला होता. बाहेरील मजुरांच्या उपस्थितीवर मात्र उत्तर देण्यास टाळाटाळ केल्याने या मग्रारोहयोच्या पांदणरस्ता बांधकामप्रकरणी राज्यसरकारच्या रोहयो विभागाने अभियंत्याच्या भूमिकेची व ग्रामपंचायत सरपंचाची सुध्दा चौकशी करुन कामाची गुणवत्ता तपासण्याकरीता त्वरीत दखल न घेतल्यास पावसाचे कारण पुढे करुन शासनाच्या लाखो रुपयाची बंदरबाट या पांदणरस्ता बांधकामातून होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

मग्रारोहयो अंतर्गत कामे अंदाजपत्रकानुसार करण्यात आली नसल्याने बाहेरील एजंसी किंवा अधिकारी, जिल्हा परिषदेचे उपविभागीय अभियंत्याच्या माध्यमातून या कामाचे मुल्याकंन केल्यास यातील मोठे गौडबंगाल पुढे येण्याची शक्यता आहे. मात्र जिल्हा स्तरावरील अधिकारी तक्रारीनंतरही व मनरेगा आयुक्तांच्या चौकशी पत्रानंतरही लक्ष दयायला पुढे आलेले नाही. उलट तक्रार केलेल्या कामांचे देयके ही काढण्यासाठी लगीनघाई करण्यातच धन्यता मानल्याने मनरेगातील भ्रष्टाचारावर अधिकाऱ्यांकडून अंकुश लागेल असे म्हणणे चुकीचे ठरणार आहे.

# जिल्ह्यातील सहा तालुक्यात मेगा वॉटरशेड प्रोजेक्ट

**गोंदिया :** महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत "हाय ईम्पॅक्ट मेगा वॉटरशेड प्रोजेक्ट'ची गोंदिया जिल्ह्यातही अंमलबजावणी होणार असून यासाठी जिल्ह्यातील सहा तालुक्यांमध्ये पुढील पाच वर्षात हा प्रकल्प राबविण्यात येणार आहे.

जिल्हाधिकारी कार्यालयात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत "हाय ईम्पॅक्ट मेगा वॉटरशेड प्रोजेक्ट' च्या अंमलबजावणीकरीता नुकतीच जिल्हाधिकारी चिन्मय गोतमारे यांच्या अध्यक्षतेखाली समन्वय सभा घेण्यात आली.


उपजिल्हाधिकारी (रोहयो) चंद्रभान खंडाईत, प्रकल्पाचे क्षेत्रीय समन्वयक नितेश बोपचे, समता निर्माण विशेतज्ञ अरविंद उईके, जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी हिंदुराव चव्हाण, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ.कांतीलाल पटले, सहायक जिल्हा माहिती अधिकारी कैलाश गजभिये यांची यावेळी प्रामुख्याने उपस्थिती होती.

या प्रकल्पाच्या अनुषंगाने मग्रारोहयो अंतर्गत ॲक्सीस बँक फाऊंडेशन आणि भारत रुरल लाइव्हलीवुड फाऊंडेशन आणि मनरेगा यांच्यात सामंजस्य करार झाला असून गोंदिया जिल्ह्यातील आमगाव, देवरी, सडक अर्जुनी (Intensive) आणि सालेकसा, अर्जुनी मोरगाव, तिरोडा (छेप खपींशपीळींश) अशा एकूण ६ तालुक्यांमध्ये "हाय ईम्पॅक्ट मेगा वॉटरशेड प्रोजेक्ट' पुढील पाच वर्षापर्यंत राबविण्यात येणार असल्याचे बैठकीत सांगण्यात आले.

महाराष्ट्रातील सुमारे एक लाख कुटूंबांचे उत्पन्न दुप्पट करणे तसेच १.७७ लक्ष हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली आणणे ही या उपक्रमाची प्रमुख उद्दिष्ट आहेत. राज्यातील २६ तालुक्यांमधील ८७८ मायक्रो वॉटरशेड यासाठी विकसित केली जाणार आहेत. आजची मजुरी ही उद्याची समृध्दी आहे असे या प्रकल्पाचे घोषवाक्य आहे. अशी माहिती हाय ईम्पॅक्ट मेगा वॉटरशेड प्रोजेक्टचे क्षेत्रीय समन्वयक नितेश बोपचे यांनी दिली.

# विदर्भात ओबीसी जनगणना संकल्प यात्रा

**नागपूर:** मराठा आरक्षणा-वरुन राज्यातील वातावरण तापले असताना बिहारच्या धर्तीवर आता महाराष्ट्रातही जातीय जनगणना करावी. या मागणीसाठी ओबीसी बहुजन युवा मंचाकडून विदर्भातून संकल्प यात्रा काढण्यात येणार आहे. मराठा समाजाच्या आंदोलनाच्या दबावामुळे महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोगामार्फत मराठा समाजाचे सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक मागासलेपणा तपासण्यासाठी सर्वेक्षण करत आहे. त्यामुळे याच धर्तीवर ओबीसींचीही जातीय जनगणना करावी यासाठी ३ ते १२ फेब्रुवारीदरम्यान विदर्भाच्या सात जिल्ह्यातून ही संकल्प यात्रा काढण्यात येणार आहे.




ओबीसी जनगणना संकल्प यात्रेचे प्रमुख उमेश कोर्राम यांनी सांगितले की, ओबीसी राजकीय आरक्षणाचा सर्वोच्च न्यायालयातील खटला, रोहिणी आयोग, भारत सरकार व नीती आयोगाकडून कायम ओबीसी डेटाची मागणी केली जाते. मात्र १९३१ पासून आतापर्यंत ओबीसींची जातिनिहाय जनगणना न झाल्यामुळे भारत सरकारकडे डेटा उपलब्ध नाही. परिणामी अनेकवेळा न्यायालयात अथवा धोरण ठरवताना शसनाला अनेक अडचणी येतात. यामुळे मंडल आयोगाने ठरवलेल्या ५२ टक्के ओबीसी समुदायावर अन्याय होत आहे. सध्या महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोगामार्फत मराठा समाजाचे सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक मागसलेपण तपासण्यासाठी सर्वेक्षण करण्यात येत आहे. शासकीय अधिकारी आणि कर्मचाऱ्यांमार्फत ३१ जानेवारीपर्यंत हे सर्वेक्षण होईल. या कालावधीदरम्यान नियुक्त केलेले अधिकारी आणि कर्मचारी घरोघरी जाऊन कुटूंबाची माहिती घेणार आहेत. यातच ओबीसी जनगणनाही होणे शक्य आहे.

बिहार राज्याची जनगणणा यशस्वी झाली की महाराष्ट्रातही जातिनिहाय जनगणना करु असे आश्वासन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी २९ सप्टेंबर २०२३ ला झालेल्या विविध ओबीसी संघटना आणि महाराष्ट्र शासनामध्ये झालेल्या बैठकीत दिले होते. ओबीसी समाजाकडून अनेक वर्षांपासून जातिनिहाय जनगनणेची मागणी लावून धरली जात आहे. परंतु शासनाने याकडे दुर्लक्ष केले आहे.

बिहार राज्याने यशस्वीरित्या जातिनिहाय जनगणना केली आहे. सोबतच आंधप्रदेशातसुद्धा जातिनिहाय जनगणनेला सुरुवात झाली आहे. तेव्हा महाराष्ट्र राज्यातही जातिनिहाय जनगणना झालीच पाहिजे. यासाठी ओबीसी जनमानसात जनजागरण व महाराष्ट्र शासनाला अवगत करण्याच्या उद्देशाने पूर्व विदर्भाच्या सात जिल्ह्यांमधून ओबीसी जनगणना यात्रेचे आयोजन केल्याचे कोर्राम यांनी सांगितले.

# ९ वर्षानंतर ९ फेब्रुवारीला होणार मेडिकल कॉलेजच्या इमारतीचे भूमिपूजन

# सहाशे कोटी रुपयांचा निधी मंजूर

**गोंदिया:** येथे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय (मेडिकल कॉलेज) मंजूर होऊन ९ वर्षे झाली. मात्र, मेडिकल कॉलेजची स्वतंत्र इमारत न उभारण्यात आल्याने या मेडिकल कॉलेजचा कारभार मागील नऊ वर्षांपासून केटीएस आणि बाई गंगाबाई महिला रुग्णालयाच्या इमारतीतून सुरु आहे. त्यामुळे मेडिकलचे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांनासुद्धा विविध अडचणींना तोंड द्यावे लागत होते. तब्बल नऊ वर्षानंतर आता इमारत बांधकामाचा प्रश्न मार्गी लागला असून येत्या ९ फेब्रुवारीला मेडिकल कॉलेजच्या इमारत बांधकामाला सुरुवात होणार आहे.




गोंदिया येथे सन २०२० मेडिकल कॉलेज मंजूर करण्यात आले. यासाठी ४३० कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला होता. मेडिकल कॉलेजसाठी कुडवा परिसरात जागासुद्धा अधिग्रहित करण्यत आली आहे. यासाठी निविदा प्रक्रिया होऊन दिल्ली येथील एका बांधकाम कंपनीला कंत्राट देण्यात आले होते. मात्र, मध्येच माशी कुठे शिंकली कुणास ठाऊक तेव्हापासून या इमारतीचे बांधकाम रखडले. त्यामुळे

## रुग्णांची नागपूरपर्यंतची पायपीट थांबणार

**कुडवा येथील ९ एकर जागेवर मेडिकल कॉलेजची इमारत उभारण्यात येणार आहे. पाचशे खाटांचे मेडिकल कॉलेज असणार असून यात सर्व दर्जेदार आरोग्य विषयक सुविधा उपलब्ध करुन दिल्या जाणार आहेत. त्यामुळे रुग्णांना नागपूर, मुंबई व हैदराबाद येथे उपचारासाठी ये-जा करण्याची पायपीट दुर होणार आहे.**

मेडिकल कॉलेजचा कारभार सध्या केटीएस जिल्हा सामान्य रुग्णालय आणि बाई गंगाबाई महिला रुग्णालयाच्या इमारतीतून सुरु आहे. पण येथे जागा अपुरी असल्याने अजूनही विविध विभाग कार्यान्वित होऊ शकले नाही. त्यामुळे रुग्णांना दर्जेदार आरोग्य विषयक सोयी सुविधा मिळण्यापासून वंचित राहावे लागत आहे. तर, मेडिकलचे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना वसतिगृहास इतर समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. गेल्या ९ वर्षांपासून ही समस्या कायम असल्याने या विद्यार्थ्यांनी आंदोलनसुद्धा केले होते. अखेर या सर्व गोष्टींची दखल शासन आणि प्रशासनाने गांभीर्याने घेतली आहे. मेडिकल कॉलेजच्या इमारत बांधकामासाठी सहाशे कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे. ९ फेब्रुवारीला मेडिकल कॉलेजच्या इमारतीचे भूमिपूजन करण्यात येणार असल्याचे पालकमंत्री धर्मरावबाबा आत्राम यांनी सांगितले.

## संपादकीय

# इंडिया आघाडीला लागला सुरुंग

देशातीलच नव्हे, तर जगभरात ज्यांचा दबदबा सतत वाढत आहे असे महाशक्तीशाली नेते, देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि त्यांचा सर्वव्यापी असा भक्कम पक्ष भाजपा यांना कमकुवत करण्यासाठी, तसेच आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पक्षप्रणीत एनडीए आघाडीला टक्कर देण्यासाठी विरोधी पक्षांनी एकजूट करून इंडिया आघाडीची स्थापना केली. देशातील सर्वात जुना आणि राष्ट्रव्यापी (?) पक्ष काँग्रेसच्या पुढाकाराने मोदी आणि भाजपाला रोखण्यासाठी प्रयत्न व्हायला हवेत, या एकाच विचाराने आघाडी तयार करण्यासाठी विविध पक्षांच्या अनेक बैठका झाल्या. एनडीएच्या विरोधात पर्यायाची घोषणा करण्यात आली. देशभरात भाजपाविरोधी वातावरण निर्मितीचा प्रयत्न झाला. मात्र त्याचा ठोस परिणाम निघाला नसल्याचे चित्र सध्या दिसत आहे. या सगळ्या विरोधी पक्षांमध्ये काँग्रेस हा मोठा भाऊ म्हणून भूमिका पार पाडत होता. मात्र आता या आघाडीत बिघाडी झाल्याचे दिसत आहे.

आगामी लोकसभा निवडणुकांची घोषणा होण्यापूर्वीच जागावाटपावरून इंडिया आघाडीतील मतभेद चव्हाट्यावर आले आहेत. लोकसभा निवडणुकीसाठी विरोधक एकत्रित लढण्याचा प्रयत्न करत आहेत. मात्र इंडिया आघाडीतील पक्षांमध्ये जागावाटपावरून मतभेद आहेत. पश्चिम बंगाल, पंजाब, दिल्ली, उत्तर प्रदेश, बिहार आणि केरळसह अनेक राज्यांमधील या घटक पक्षांमध्ये एकमत झालेले नाही. शिवाय पश्चिम बंगालमध्ये ममता बॅनर्जी आणि पंजाबमध्ये ङ्गआपफ्ने निवडणूक एकट्याने लढवणार असल्याचे स्पष्ट केले आहे. इंडिया आघाडीसाठी सर्वांत कठीण परिस्थिती ही पश्चिम बंगालमध्ये आहे. काँग्रेसपासून तयार झालेल्या ममता बॅनर्जी यांच्या तृणमूल काँग्रेसने लोकसभा निवडणुकीसाठी काँग्रेसला फक्त दोनच जागा देण्याचा प्रस्ताव ठेवला व काँग्रेसची सध्याची औकात काय आहे हे दाखवून देण्याचा प्रयत्न केला, असे म्हणायला हरकत नाही. तथापि काँग्रेसने मात्र हा प्रस्ताव फेटाळला असून, अधीर रंजन चौधरी यांनी या प्रस्तावावरून ममता बॅनर्जी यांच्यावरच तोफ डागली. त्यातूनच नंतर तृणमूल काँग्रेसने ङ्गएकाला चलो रेफ्चा नारा दिला.विशेष म्हणजे डाव्यांचा गड असलेल्या पश्चिम बंगालमध्ये ममता बॅनर्जी यांनी एकहाती सत्ता मिळवली आहे. त्यांच्या पक्षाचा पायाच डाव्यांना विरोध हा आहे. कम्युनिस्ट पक्षांचे कुशासन, भ्रष्टाचार आणि हिंसाचार याविरोधात ममता बॅनर्जी निडरपणे रस्त्यावर उतरल्या होत्या. असे असताना लोकसभा निवडणुकीत त्याच डाव्यांसोबत जनतेसमोर कसे जायचे, हाही तृणमूलसमोरचा अवघड प्रश्न आहे. कारण जनतेला याचे उत्तर द्यावे लागेल की, ज्यांच्या विरोधात एवढी वर्षे लढलो आता त्यांच्याच सोबत जाण्याची वेळ का आली आहे. पुन्हा विधानसभा निवडणुकीत त्यांच्यासोबतच दोन हात करायचे आहेत. त्यामुळे तृणमूलला लोकसभेत डाव्यांसोबत एकत्र लढणे शक्य नसल्यामुळेच ममतांनी ङ्गएकला चलो रेफ्चा निर्णय घेतला असण्याची शक्यता आहे. ममता बॅनर्जी या प्रत्यक्ष बाहेर पडल्या नसल्या तरी त्यांनी सवता सुभा मांडल्यामुळे, इंडिया आघाडी काहीशी कमकुवत झाल्याचे दिसत आहे. दिल्ली आणि पंजाबमध्ये अरविंद केजरीवाल यांच्या आम आदमी पक्षानेही (आप) स्वतंत्र लढण्याची मनीषा व्यक्त केल्याने आधीच डळमळीत झालेल्या या आघाडीचे मुख्य नेते व नियोजक नितीशकुमार यांनीच १८० अंशांची जबरदस्त गिरकी घेत भाजपाप्रणीत एनडीएमध्ये सामील होण्याचा अचानक निर्णय घेतल्याने या आघाडीला जणू सुरुंगच लागला आहे.

तसेच उत्तर प्रदेशातही अखिलेश यादव यांनी काँग्रेसला नेमकी परिस्थिती काय आहे हे स्पष्टपणे सांगितल्यामुळे हा पक्ष नाराज झाला आहे. सध्याची ही परिस्थिती पाहता विरोधकांची ही इंडिया आघाडी आपल्या गंतव्यस्थानापर्यंत पोहोचण्याच्या आधीच तुटणार असल्याचे दिसत आहे. त्यामागचे मूळ कारण असे होते की, ज्या राज्यांत आपला जनमानस गमावला होता, त्या राज्यांतील स्थानिक पक्षांशी हातमिळवणी करून काँग्रेसला आपली ताकद वाढवायची होती. पण लोकसभा निवडणुकांआधी जागा वाटपांवरून या बहुपक्षीय आघाडीत मतभेद होण्याची शक्यता असल्याचे भाकीत राजकीय विश्लेषकांकडून अनेकदा वर्तविण्यात आले होते. तथापि आता पश्चिम बंगालमध्ये ममता बॅनर्जी आणि बिहारमध्ये नितीश कुमार यांनी घेतलेल्या वेगळ्या निर्णयांनंतर आता आघाडीत राहिलेल्या इतर पक्षांच्या भूमिकेत काय बदल होणार, हे येत्या काळात स्पष्ट होईल, तर जम्मू-काश्मीरमधील नॅशनल कॉन्फरन्सचे नेते फारुक अब्दुल्ला यांनीही इंडिया आघाडीबाबत स्पष्ट मत व्यक्त केले आहे.

अद्यापही वेळ गेलेली नाही. मात्र जागावाटपावर जर एकमत झाले नाही, तर इंडिया आघाडीचे काही खरे नाही, असा इशाराच फारुक अब्दुल्ला यांनी दिला आहे, तर महाराष्ट्रात इंडिया आघाडीत येऊ पाहणाऱ्या वंचित बहुजन आघाडीलाही अद्याप निमंत्रण देण्यात आलेले नाही आणि स्थानही देण्यात आलेले नाही. त्यामुळे इंडिया आघाडीत समाविष्ट होण्यास इच्छुक असलेल्या वंचितनेही नाराजीचा सूर लावला आहे. विरोधकांच्या मते एकाधिकारशाही म्हणजेच हुकूमशाही गाजविणारे नरेंद्र मोदी आणि भारतीय जनता पार्टीच्या दडपशाहीच्या विरोधात विरोधकांनी एकजूट करीत, इंडिया आघाडीची स्थापना केली. मात्र ही इंडिया आघाडी सुरुवातीपासूनच नाराजीच्या ग्रहणाने ग्रासलेली होती. इंडिया आघाडीतील काही नेते हे नेतृत्वावरून तसेच इंडिया आघाडीत मिळणाऱ्या मानावरून वरचेवर नाराज असल्याचे चित्र पाहायला मिळत होते. लोकसभा निवडणुकांसाठी आता अगदीच कमी कालावधी आहे. त्यामुळे जागावाटप जर लवकर झाले नाही, तर इंडिया आघाडीसाठी हा मोठा धोका ठरू शकेल. इंडिया आघाडीत समाविष्ट असलेल्या पक्षांमध्ये याबाबत लवकरच एकमत झाले नाही, ते पक्ष स्वतंत्र लढण्याचा निर्णय घेऊ शकतात आणि असे झाले तर इंडिया आघाडीसाठी तो कपाळमोक्ष ठरू शकतो.

# कर्पूरी ठाकूर: मरणोत्तर भारतरत्न जाहीर झालेले बिहारचे माजी मुख्यमंत्री



भारत सरकारने बिहारचे माजी मुख्यमंत्री कर्पूरी ठाकूर यांना मरणोत्तर भारतरत्न देण्याचा निर्णय घेतला आहे. कर्पूरी ठाकूर यांच्या शंभराव्या जयंतीच्या आदल्याच दिवशी हा निर्णय झाला आहे.

राष्ट्रपती भवनातर्फे जाहीर झालेल्या एका प्रसिद्धी पत्रकात कर्पूरी ठाकूर यांना मरणोत्तर भारतरत्न देण्याची घोषणा झाली आहे. या घोषणेनंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ट्वीट केले आहे. ते म्हणतात, भारत सरकारने सामाजिक न्यायाचे पुरस्कर्ते महान लोकनायक कर्पूरी ठाकूर यांना भारतरत्नाने सन्मानित करण्याचा निर्णय घेतला आहे, याबद्दल मला अत्यंत आनंद होत आहे. त्यांच्या जन्मशताब्दीच्या प्रसंगी हा निर्णय देशातील नागरिकांचा गौरव करणारा आहे.

मागास आणि वंचितांच्या उद्धारासाठी कर्पूरीजी यांची अतूट कटिबद्धता आणि त्यांच्या दूरदशी नेतृत्वाने भारताच्या सामाजिक-राजकीय स्थितीवर अमिट छाप सोडली आहे. हा भारतरत्न फक्त त्यांच्या अतुलनीय योगदानाचा सन्मान नसून यामुळे समाजातील समरसतेला प्रोत्साहन मिळेल. २४ जानेवारी १९२४ रोजी बिहारमधील समस्तीपूरमधील पितौंझिया गावात त्यांचा जन्म झाला होता. आज या गावाचं नाव कर्पूरीग्राम असं आहे.

कर्पूरी ठाकूर बिहारचे एकदा उपमुख्यमंत्री, दोनदा मुख्यमंत्री आणि अनेक दशकं आमदार होते. ते विरोधी पक्ष नेतेही होते.

कोण होते कर्पूरी ठाकूर?

कर्पूरी ठाकूर हे बिहारमधील नाभिक समाजाचे सर्वांत मोठे नेते होते. मग प्रश्न असा उपस्थित होतो की, या समाजाची संख्या दोन टक्क्यांपेक्षाही कमी असताना कर्पूरी ठाकूर यांच्या राजकीय वारशाबद्दल इतकी स्पर्धा का आहे?

याचं सर्वांत मोठं कारण म्हणजे कर्पूरी ठाकूर यांची ओळख अत्यंत मागासवर्गीय (ईबीसी) चे मोठे नेते म्हणून झाली आहे. ईबीसी या समूहामध्ये १०० पेक्षा जास्त जातींचा समावेश आहे.

यामध्ये निवडणुकीच्या दृष्टीने गणित मांडायच तर एकत्रितपणे त्यांची २९ टक्के व्होट बँक तयार होते. २००५ मध्ये नितीश कुमार यांना पहिल्यांदा मुख्यमंत्री बनवण्यात या गटाने महत्त्वाची भूमिका बजावली होती. या दृष्टीकोनातून हा गट आता बिहारमध्ये राजकीयदृष्ट्या खूप महत्तवाचा बनला आहे, प्रत्येक पक्षाला ही व्होट बँक आपल्याकडे आणायची आहे.

खरं तर मंडल आयोग लागू होण्यापूर्वी कर्पूरी ठाकूर बिहारच्या राजकारणात अशा ठिकाणी पोहोचले होते जिथे सामान्य पार्श्वभूमीतून आलेल्या व्यक्तीने पोहोचणं जवळजवळ अशक्य होतं. बिहारच्या राजकारणात त्यांना गरिबांचा सर्वात मोठा आवाज मानलं जायचं. १९५२ मध्ये पहिल्यांदा विधानसभेची निवडणूक जिंकल्यानंतर ते बिहार विधानसभा निवडणुकीत कधीही पराभूत झाले नाहीत.

अडीच वर्षांच्या मुख्यमंत्रिपदाच्या कारकिर्दीत त्यांनी बिहारच्या समाजावर अशी छाप सोडली की त्याचं दुसरं कोणतंही उदाहरण बिहारच्या इतिहासात सापडणार नाही. विशेष म्हणजे ते बिहारचे पहिले बिगर काँग्रेसी मुख्यमंत्री होते.

### सामाजिक बदलांची सुरुवात

१९६७ मध्ये पहिल्यांदा उपमुख्यमंत्री झाल्यावर त्यांनी इंग्रजीची अट रद्द केली. त्यामुळे त्यांच्यावर खूप टीका झाली पण त्यांच्यामुळेच शिक्षणाची गंगा सर्वसामान्यांपर्यंत पोहोचली.

या काळात मॅट्रिक मध्ये इंग्रजीत नापास झालेल्या पण इतर विषयात पास झालेल्या विद्यार्थ्यांना मकर्पुरी विभागातून उत्तीर्ण झाला आहेफ असं म्हणून खिल्ली उडवली जायची.

याच काळात त्यांना शिक्षणमंत्रीपदही मिळालं आणि त्यांच्या प्रयत्नांमुळे मिशनरी शाळांमध्ये हिंदीतून शिक्षण सुरू झालं.

आर्थिकदृष्ट्या गरीब मुलांच्या शाळेची फी माफ करण्याचं कामही त्यांनी केलं. ते देशातील पहिले असे मुख्यमंत्री होते, ज्यांनी आपल्या राज्यात मॅट्रिकपर्यंत मोफत शिक्षण देण्याची घोषणा केली होती. राज्यात उर्दूला दुस?या राजभाषेचा दर्जा देण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले.१९७१ मध्ये मुख्यमंत्री झाल्यानंतर शेतकऱ्यांना मोठा दिलासा देत त्यांनी जमिनींवरील महसूल कर बंद केला.

बिहारच्या तत्कालीन मुख्यमंत्री सचिवालयाच्या इमारतीतील लिफ्ट चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांना वापरता येत नव्हती. मुख्यमंत्री होताच त्यांनी चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांना लिफ्टचा वापर करता येईल यासाठी प्रयत्न केले.

आज जरी हे अगदी लहान पाऊल वाटत असलं तरी त्या काळात राजकारणात याला खूप महत्त्व होतं. बिहारचे माजी आमदार प्रेम कुमार मणी म्हणतात, त्यावेळी समाजात आंतरजातीय विवाह सुरू असल्याची बातमी मिळताच ते त्यात सामील व्हायचे. त्यांना समाजात एक प्रकारचा बदल हवा होता. १९७७ मध्ये मुख्यमंत्री झाल्यानंतर त्यांनी मुंगेरीलाल आयोगाची अंमलबजावणी करत राज्यात नोकरीत आरक्षण लागू केलं. त्यामुळे ते उच्चवर्णीयांचे कायमचे शत्रू बनले.

कर्पूरी ठाकूर यांनी समाजातील अत्याचारित मागासवर्गीयांच्या हितासाठी काम केलं.

मुख्यमंत्री असताना त्यांनी राज्यातील सर्व विभागांमध्ये हिंदीतून काम करणं बंधनकारक केलं होतं. इतकंच नाही तर राज्यात सरकारी कर्मचाऱ्यांना समान वेतन आयोग लागू करणारे ते पहिले मुख्यमंत्री होते. तरुणांना रोजगार मिळवून देण्यासाठी त्यांनी मोठी खटपट केली होती. त्यासाठी त्यांनी रोजगार मेळाव्याचं आयोजन करत एकाच वेळी ९००० हून अधिक अभियंते आणि डॉक्टरांना नोकऱ्या दिल्या होत्या. आजपर्यंत बिहारमध्ये एवढ्या मोठ्या प्रमाणावर अभियंते आणि डॉक्टरांना नोकरीवर घेण्याची ही एकमेव घटना असेल.

राजकारणात गोरगरिबांचा आवाज बुलंद करण्यासाठी अहोरात्र झटणाऱ्या कर्पूरी ठाकूर यांना साहित्य, कला आणि संस्कृतीची प्रचंड आवड होती. प्रेमकुमार मणी सांगतात, ङ्गही घटना १९८०-८१ मधील असावी. मी स्वतः त्यांना पाटणा येथील पारिजात प्रकाशनाच्या दुकानात महिस्ट्री ऑफ धर्मशास्त्रफ खरेदी करताना पाहिलं होतं. त्या सहा खंडांच्या पुस्तकाची किंमत तीन ते साडेतीन हजार रुपये होती. वाचनासाठी ते आवर्जून वेळ काढायचे.

### साधेपणा आणि प्रामाणिकपणाचं जीवन

राजकारणातील एवढ्या वर्षांच्या प्रदीर्घ प्रवासानंतर त्यांच्या नावावर साधं घरही नव्हतं. पाटण्यात असलेल्या त्यांच्या वडिलोपार्जित घरामध्ये त्यांना साधी एक इंचाची देखील वाढ करता आली नाही. बिहारमध्ये आजही त्यांच्या प्रामाणिकपणाचे अनेक किस्से ऐकायला मिळतात.

त्यांच्याशी संबंधित काही लोक सांगतात की, कर्पूरी ठाकूर राज्याचे मुख्यमंत्री असताना त्यांचे नातेवाईक त्यांच्याकडे नोकरी मागण्यासाठी गेले होते. त्यांनी शिफारस करावी अशी त्या नातेवाईकाची इच्छा होती. ते ऐकून कर्पूरी ठाकूर गंभीर झाले. त्यांनी त्यांच्या खिशातून पन्नास रुपयांची नोट काढून त्या नातेवाईकाच्या हातात ठेवली आणि म्हणाले, वस्तरा वगैरे घ्या आणि तुमचा वडिलोपार्जित व्यवसाय सुरू करा. त्या काळात घडलेली घटना म्हणजे ते मुख्यमंत्री असताना त्यांच्या गावातील काही सरंजामदारांनी त्यांच्या वडिलांचा अपमान करण्याचा प्रयत्न केला.

ही बातमी मिळताच जिल्हा दंडाधिकारी कारवाई करण्यासाठी गावात पोहोचले. पण कर्पूरी ठाकूर यांनी जिल्हाधिकाऱ्यांना कारवाई करण्यापासून रोखलं. ते म्हणाले की, प्रत्येक गावात मागासवर्गीयांचा असाच अपमान केला जातो.

दुसरं उदाहरण म्हणजे कर्पूरी ठाकूर जेव्हा पहिल्यांदा मुख्यमंत्री झाले तेव्हा त्यांनी त्यांच्या मुलाला, रामनाथ यांना पत्र लिहिलं. यात ते म्हणतात, तू या पदापासून प्रभावित होऊ नकोस. जर तुला कोणी प्रलोभन दाखवलं तर त्याला बळी पडू नको, नाही तर माझी बदनामी होईल.

### आणि कर्पुरी ठाकूर यांनी कोट मागवून घेतला

उत्तरप्रदेशातील एक मातब्बर नेते हेमवती नंदन बहुगुणा यांनी आपल्या आठवणींमध्ये लिहिलंय की, कर्पूरी ठाकूर यांची आर्थिक चणचण पाहून देवीलाल यांनी पाटण्यातील त्यांच्या एका हरियाणवी मित्राला सांगितलं होतं की जर कर्पुरी ठाकूर यांनी तुझ्याकडे कधी जर पाच-दहा हजार रुपये मागितले तर त्याला ते दे. ते कर्ज मी फेडीन. नंतर देवीलाल यांनी अनेकदा आपल्या मित्राला याविषयी विचारलं पण कर्पूरी ठाकूर यांनी कधीही या मित्राकडे रुपया मागितला नव्हता.

रामनाथ त्यांच्या वडिलांच्या साधेपणाचा एक प्रसंग सांगतात, १९५२ मध्ये ते आमदार झाले. त्यांना एका शिष्टमंडळात सहभागी होण्यासाठी ऑस्ट्रियाला जावं लागणार होतं. त्यांच्याकडे कोट नव्हता. त्यांना एका मित्राकडून तो मागवावा लागला. ते युगोस्लाव्हियाला गेले असताना मार्शल टिटो यांनी त्यांचा फाटलेला कोट पाहिला आणि त्यांना एक नवा कोट भेट म्हणून दिला. प्रेम कुमार मणी म्हणतात की, खरं तर कर्पूरी ठाकूर हे समाजवादी राजकारणातील एक महान नेते होते. त्यांचं नाव घेणारे त्यांचा साधेपणा आणि प्रामाणिकपणाचा मार्ग अवलंबण्याचं धाडस करू शकणार नाहीत, म्हणून कर्पूरी ठाकूर यांच्या सारख्या नेत्यांचं स्मरण करणं आवश्यक आहे.

बिहारच्या राजकारणात असं म्हटलं जातं की त्यांनी कायम दबावाचं राजकारण केलं. त्यांच्यावर राजकीय फसवणूक केल्याचाही आरोप केला जातो. जातीय समीकरणे लक्षात घेऊन निवडणुकीत उमेदवार ठरवण्याच्या त्यांच्या भूमिकेवर लोक प्रश्न उपस्थित करत राहिले, पण बिहारच्या पारंपारिक व्यवस्थेत कर्पुरी ठाकूर कायम वंचितांचा आवाज बनून राहिले.

काँग्रेस पक्षाचे राजकीय डावपेच आणि समाजवादी छावणीतील नेत्यांच्या महत्त्वाकांक्षाही त्यांना समजल्या होत्या. सरकार स्थापनेसाठी त्यांनी लवचिक दृष्किोन स्वीकारला आणि युतीचं सरकार स्थापन केलं.

यामुळे त्यांचे मित्र असो वा शत्रू, दोघांनाही त्यांच्या राजकीय निर्णयांबाबत अंदाज लावणं कठीण व्हायचं. कर्पूरी ठाकूर यांचं १७ फेब्रुवारी १९८८ रोजी, वयाच्या ६४ व्या वर्षी हृदयविकाराच्या झटक्याने निधन झालं.

# नवेगावबांध राष्ट्रीय उद्यानात झुक झुक गाडीचे थाटात लोकार्पण

**अर्जुनी मोरगाव:** जगाच्या इतिहासात नवेगावबांध ची राष्ट्रीय उद्यान म्हणुन ओळख आहे. निसर्गाने येथे भरभरुन सौंदर्य दिले आहे. या राष्ट्रीय उद्यानाला गतवैभव प्राप्त करण्यासाठी मी नेहमीच प्रयत्नशील राहिलो आहो. बच्चेकंपनीच्या झुक झुक गाडी ला हिरवी झेंडी दाखवुन माझे हातानी लोकार्पण झाले. यापेक्षा दुसरा आनंदच होवु शकत नाही.नवेगावबांध राष्ट्रीय उद्यान संकुल परिसरात योग्य नियोजन करुन या परिसराचा विकास करण्याचा आपला प्रामाणिक प्रयत्न आहे.



विकास आराखड्यानुसार नौकाविहार, इंटरप्रिटेशन हॉल, डोमेस्टिक बर्डस झु, विविध प्रकारचे गार्डन, लाईट शो,असे वैविध्य असणारे पर्यटन या ठिकाणी करु या करिता सर्वांचे सहकार्य अपेक्षित आहे. याच सहकार्यातुन संकुल परिसरात दर्जेदार सेवा सोयी वाढवुन पर्यटन वाढवु असे आवाहन माजी सामाजिक न्याय व विशेष सहाय्य मंत्री ईजी. राजकुमार बडोले यांनी केले आहे.

नवेगाव बांध राष्ट्रीय उद्यानाच्या पर्यटन संकुल परिसरात २६ जानेवारी रोजी झुक झुक गाडीचे आगमन झाले. त्यावेळी हिरवी झेंडी दाखवून लोकार्पण करताना माजी मंत्री राजकुमार बडोले बोलत होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी शिवसेनेचे जिल्हाप्रमुख शैलेश जयस्वाल होते. तर प्रमुख अतिथी म्हणून जिल्हा परिषद सदस्या रचनाताई गहाणे, शारदाताई बडोले ,पंचायत समितीचे उपसभापती होमराज पुस्तोडे, तंटामुक्त अध्यक्ष हरिचंद्र चांदेवार, एकनाथ बोरकर ,वैशाली बोरकर, उद्योगपती बबलू जैन, माजी सैनिक नीलमचंद पंधरे, उद्योगपती नितीन पुगलीया, नवेगाव बांध फाउंडेशनचे अध्यक्ष विजय डोये, सचिव रामदास बोरकर, माजी जिल्हा परिषद सदस्य किशोर तरोणे, लोकपाल गहाणे, इंजि. सुनील तरोणे प्रामुख्याने उपस्थित होते.

नवेगाव बांध पर्यटन संकुलातील ग्रीन पार्क उपहारगृह परिसरामध्ये इंजि. सुनील तरोणे यांच्या कल्पनेतून व यांच्या प्रयत्नाने एका बॅटरी चलीत झुक झुक गाडी चे संचालन करण्यात आले. या झुक झुक गाडी ला माजी मंत्री राजकुमार बडोले यांनी हिरवी झेंडे दाखवली. ही झुक झुक गाडी बॅटरीवर संचालीत एक इंजीन व तीन डब्बे असून प्रत्येक डब्यात ४ ते ६ बच्चे पर्यटक बसू शकतात.

नवेगावबांध राष्ट्रीय उद्यानात हिलटाप गार्डन, ग्रीनपार्क उपहारगृह व आता झुक झुक गाडी ही सर्व ईजी. सुनिल तरोणे यांचे कल्पकतेतुनच साकार होत असुन या उद्यानातील संकुल परिसराचा कायापालट करुन पर्यटक वाढविण्याचे दृष्टीने आपले प्रयत्न असल्याचे सुनिल तरोणे यांनी सांगितले.

## आदिवासी विवाह सोहळ्यात विवाहबध्द होण्यासाठी इच्छुक नवदाम्पत्यांकडून अर्ज आमंत्रित

**गोंदिया:** जिल्ह्यातील आदिवासी विवाहबध्द होणऱ्या नवदाम्प्यांना तसेच नोंदणीकृत विवाह संस्थांकडून सन २०२४-२५ सत्रात आयोजित विवाह सोहळ्यात भाग घेऊन विवाहबध्द होण्यासाठी इच्छुक असलेल्या आदिवासी नवदाम्प्यांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

सदर विवाह सोहळ्यात भाग घेऊन विवाहबध्द होणाऱ्या आदिवासी नविन जोडप्यांना प्रती जोडप्यांना १० हजार रुपये सहाय्य अनुदान धनादेशाद्वारे देण्यात येणार आहे.तरी इच्छुक आदिवासी नवदाम्प्यांनी त्यांच्या भागात कार्यरत असलेल्या विवाह संस्थेमार्फत (आदिवासी सामुहिक विवाह सोहळा आयोजित करणारी) विवाह सोहळा आयोजित तारखेच्या पुवी आवश्यक कागदपत्रासह अर्ज त्यांच्या भागात कार्यरत असलेल्या विवाह संस्थेत सादर करावे. सदर अर्ज संबंधित विवाह संस्थेद्वारे योग्य ती (त्रृट्यांची) तपासणी करुन विवाह सोहळा समाप्ती पश्चात एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय, देवरी येथे सादर करावे. सदर अर्ज उशिरा प्राप्त झाल्यास व जोडप्यांना योजनेचा लाभ न मिळाल्यास संबंधित संस्था त्यास जबाबदार राहील, याची नोंद घ्यावी.

## बोंडगावदेवी जि.प.क्षेत्रात ६२ लक्ष निधीच्या विविध विकास कामांचे भुमीपुजन



**अर्जुनी-मोरगाव:** तालुक्यातील बोंडगावदेवी जिल्हा परिषद क्षेत्रांतर्गत येणा-या सिलेझरी, विहीरगाव, बोंडगाव देवी, चान्ना, इंजोरी, खांबी, दाभना येथे प्रस्तावित ६२ लक्ष रुपयांच्या विविध विकासकामांचे भूमिपूजन माजी सामाजिक न्याय व विशेष सहाय्य मंत्री ईजी राजकुमार बडोले यांचे हस्ते करण्यात आले.

यात २५१५ योजने अंतर्गत तसेच तांडावस्ती मुलभूत सुविधा अंतर्गत सिलेझरी गावातील २५ लक्ष रुपयांच्या निधीतून २ सिमेंट रस्ते, विहीरगाव गावातील ५ लक्ष रुपयांच्या निधीतून सभामंडपाचे, बोंडगाव देवी गावातील ५ लक्ष रुपयांच्या निधीतून सिमेंट रस्ते, चान्ना येथे ९ लक्ष रुपयांच्या बौद्ध विहार सभागृहाचे, इंजोरी येथील ५ लक्ष रुपयांच्या सिमेंट रस्त्यांचे, खांबी येथील ८ लक्ष रुपयांच्या सिमेंट रस्त्यांचे तसेच दाभना येथील ५ लक्ष रुपयांच्या रस्त्यांचे भूमिपूजन करण्यात आले.

यावेळी जिल्हा परिषद गटनेते तथा सदस्य लायकराम भेंडारकर, भाजप तालुकाध्यक्ष विजय कापगते, पंचायत समिती सदस्य.संदिप कापगते, पंचायत समिती सदस्या कुंदाताई लोगडे, .जिवन लंजे, .व्यंकट खोब्रागडे, .लैलेश्वर शिवणकर, दिपकर उके, सिलेझरी ग्रा.प.संरपच लताताई भेंडारकर, चान्ना ग्रा.प.संरपच सचिन डोंगरे, खांबी ग्रा.प.संरपच निरुपाताई बोरकर, बोंडगाव देवी ग्रा.प.संरपच प्रतिभाताई बोरकर, दाभना ग्रा.प.संरपच लिनाताई प्रधान, राधेश्याम झोळे, रत्नाकर बोरकर, .भाग्यवान फुल्लुके, .मोरेशवर सोनवाने, सुखदेवजी मेंन्ढे, काशीनाथ कापसे, पुरुषोत्तम डोये, प्रकाशजी शिवणकर, भागवत लंजे, गोपीचंद राजगिरे सह ग्रामपंचायत उपसरपंच, सदस्य व ग्रामस्थ उपस्थित होते.

# पक्षीगणनेत अनेक विदेशी पाहुण्यांची नोंद

**पक्षीमित्रांनी पिंजून काढले तलाव; वन्यजीव बचावासाठी सेवा संस्थेचा पुढाकार**



**गोंदिया:** वन्यजीवांच्या बचावाकरिता सेवा संस्थेच्यावतीने गत आठ वर्षापासून सातत्याने काम करण्यात येत आहे. २१ जानेवारीला जिल्ह्यातील तलाव आणि पानथड क्षेत्रांवर आशियाई पक्षीगणना करण्यात आली. त्यात विविध विदेशी पक्ष्यांची नोंद करण्यात आली. याप्रसंगी पक्षीमित्रांनी भल्या पहाटेपासून शिवार पिंजून काढत आकडेजोड केली. गोंदिया जिल्हा तलावांचा जिल्हा आहे.

तलाव, पानथड क्षेत्रात विविध प्रजातींचे स्थलांतरीत तसेच स्थानिक पक्षी हिवाळ्यात मुक्कामी असतात. सेवा संस्था आणि वनविभागाच्यावतीने दरवर्षी पानथड क्षेत्रात येणाऱ्या स्थलांतरीत व स्थानिक पक्ष्यांची गणना करण्याता येते. यावर्षीही आशियाई पाणपक्षी गणना २०२४ उपक्रमांतर्गत जिल्ह्यातील परसवाडा, झिलमिली, शिवनी, छिपीया या तलावांवर ही गणना २१ जानेवारी रोजी उपवनसंरक्षक प्रमोद पंचभाई अणि सेवा संस्थेचे अध्यक्ष सावन बहेकार यांच्या मार्गदर्शनात मड ऑन बुट्स प्रोजेक्ट लिटर तसेच सेवा सदस्य कन्हैया उदापुरे, सशांक लाडेकर, सहाय्यक वनसंरक्षक योगेंद्र सिंग, वनपरिक्षेत्र अधिकारी दिलीप कौशिक यांच्या उपस्थितीत पक्षीगणना करण्यात आली.

यावेळी स्वयंसेवी, पक्षी निरीक्षक, पक्षी मित्र, सारस मित्र आदिंनी ही गणना पूर्ण केली. गणनेत सेवा संस्थेचे अंकित ठाकुर, पूजा मोरघडे, प्रतीक लांडेकर, भास्कर कापसे, परितोष सूर्यवंशी, ऋषभ महारवाडे, सानिध्य गजभिये, निशांत कुर्वे, धोटे बंधू विज्ञान महाविद्यालयाचे विद्यार्थी व शिक्षक सहभागी झाले होते.

### या पक्ष्यांची झाली नोंद

२१ जानेवारीला पानवठ्यांवर करण्यात आलेल्या पक्षी गणनेत ग्रे लेग गुज, नार्दर शोलेवर, कॉमन पोचार्ड, नार्दल पिंटेल, नोव बिल डक, युरेसियन विजन, गडवाल, मार्गनी, रेड क्रेस्टेड पोचार्ड, फेरुजिनियस, डक, टफटेड डक, कॉमन टिल आदि पक्ष्यांची नोंद झाली.

स्वामीत्व, मुद्रक, प्रकाशक व संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे यांनी बेरार टाईम्स हे साप्ताहिक वृत्तपत्र अंगपाल पारधी, लोकजन प्रकाशन, लोकजन भवन, स्नेह नगर, तकिया वॉर्ड, भंडारा ता.जि.भंडारा येथे मुद्रीत करुन डोलारे एजन्सीसमोरील रस्ता,शिवनगर गोंदिया येथे प्रकाशित केले. संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे, भ्रमणध्वनी क्र. ८०८०८१५३२९ (पी.आर.बी. कायद्यानुसार जबाबदारी संपादकावर राहील) प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (गोंदिया न्यायकक्षेत)

# डॉ.पंजाबराव देशमुख:संघर्षाचा प्रवास

**भारताचे प्रथम कृषिमंत्री, कृषिरत्न, शिक्षण महर्षी डॉ. पंजाबराव उर्फ भाऊसाहेब देशमुख यांनी ७ फेब्रुवारी १९५५ रोजी भारत कृषक समाजाची स्थापना करुन संपूर्ण शेतकरी समाजाला राष्ट्रीय स्तरावरील व्यासपीठ निर्माण करुन दिले. त्या घटनेला ७ फेब्रुवारी २०२४ रोजी ६९ वर्षाचा प्रदीर्घ कालावधी पूर्ण होत आहे. त्यानिमित्याने संघटनेच्या वाटचालीवर टाकलेला प्रकाश.**



कृषक समाजाच्या स्थापनेनंतर दरम्यानच्या काळात अनेक संघटना आल्या व नेस्तनाबूत झाल्या. डॉ. पंजाबरावांनी 'भारत कृषक समाज' या संस्थेला जाणीवपूर्वक संघटन न म्हणता समाज म्हटले आहे. यातच भाऊसाहेबांची दिव्यदृष्टी-दूरदृष्टी लक्षात येते. कृषक समाजास वैचारिक बैठक असल्यामुळेच व राजकारण तथा गट व जातपात यापासून पंजाबरावांनी ही संस्था पूर्णपणे अलिप्त ठेवल्यामुळेच शासनाचे कुठलेही आर्थिक पाठबळ नसताना ६८ वर्षानंतरही या संस्थेची घोडदौड सुरूच असून आजही आपले अस्तित्व कायम ठेवून आहे.

संघटनेच्या बळावर कामगारांपासून कर्मचाऱ्यांपर्यंत सर्वजण फायदे पदरात पाडून घेतात. मात्र शेतकरी वर्ग असंघटित असल्यामुळे तो सर्वच बाबतीत लुबाडला जातो. संपूर्ण जगाला अन्नधान्याचे बाबतीत स्वयंपूर्ण करण्याची प्रचंड ताकद या बळीराजात असताना स्वतः तो आणि त्याचे कुटुंब अर्धपोटी-अर्धनग्न असावे हे कटुसत्य डॉ. पंजाबरावांनी ओळखून भारतात एकूण लोकसंख्येच्या ७५ टक्के शेती करणाऱ्या भारतीय किसानाकरिता भारत कृषक समाज या राष्ट्रव्यापी संघटनेची स्थापना करून शेतकऱ्यांना एक स्वतंत्र व्यासपीठ निर्माण करून दिले. डॉ. पंजाबरावांनी भारत कृषक समाज ही संपूर्ण शेतकरी समाजाला उपलब्ध करून दिलेली फार मोठी देणगी आहे.

केंद्रीय कृषिमंत्री असताना डॉ. पंजाबरावांनी भव्य दिव्य अशा जागतिक कृषी प्रदर्शनाचे नवी दिल्ली येथे ११ डिसेंबर १९५९ ते फेब्रुवारी १९६० या दरम्यान आयोजन केले होते. अंदाजे १०० एकर जागेत हे प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. हे कृषी प्रदर्शन भारताच्या कृषी क्रांतीच्या इतिहासातील मैलाचा दगड ठरले. देशाच्या कानाकोपऱ्यातून शेतकऱ्यांचे लोंढेंच्या लोंढे हे प्रदर्शन पाहण्यास व ज्ञान ग्रहण करण्यास उपस्थित राहू लागले. एक नवा क्रांतीचा विचार घेऊनच शेतकरी परतत होते. जवळपास दोन कोटी शेतकऱ्यांनी ही कृषी ज्ञानगंगा प्रत्यक्ष डोळ्यांनी अनुभवली. सर्वसामान्यच नव्हे तर अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष आयसेन हॉवर, इंग्लंडच्या महाराणी एलिझाबेथ, रशियाचे पंतप्रधान बुल्गानिन, कम्युनिष्ट पक्षाच्या सर्वेसर्वा निकिता कुश्चेव आदी देश-विदेशातील गणमान्य मंडळी व भारताचे पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरू राष्ट्राध्यक्ष डॉ. राजेंद्र प्रसाद यांनी या ऐतिहासिक कृषी प्रदर्शनाची मुक्तकंठाने प्रशंसा केली. कृषी-क्रांतीचा उषःकाल निश्चित होणार असा विश्वास त्यावेळी संपूर्ण शेतकरी बांधवांमध्ये निर्माण झाला. पंजाबपासून तर कन्याकुमारीपर्यंत शेतकऱ्यांचे जबरदस्त संघटन उभे झाले. पंजाबचे शेतकरी तर महमारा पंजाबराव पंजाबदाफ असे संबोधू लागले. त्याचवेळेस खऱ्या अर्थाने कृषीक्रांतीची मुहूर्तमेढ रोवली गेली. एकंदरीत डॉ. पंजाबरावांनी या प्रदर्शनाच्या माध्यमातून भारतीय शेतकऱ्याला जागतिक दर्जा मिळवून दिला. जगात मानाचे स्थान प्राप्त करून दिले. माझा शेतकरी/शेतमजूर हा भारताचा राजा झाला पाहिजे हे भाऊसाहेबांचे स्वप्न होते.

भारत कृषक समाजाचे राष्ट्रीय कार्यालय नवी दिल्ली येथे आहे. मध्यंतरी महाराष्ट्र शासनाने कृषी क्षेत्रात कृषी विस्तार, कृषी पुरस्कार देण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला होता. ५० हजार रुपये रोख, ५० ग्रॅमचे सुवर्णपदक. सन्मानपत्र असे पुरस्काराचे स्वरुप होते. विशेष उल्लेखनीय व अभिनंदनीय बाब म्हणजे या समाजाची या पुरस्काराकरिता निवड करुन महाराष्ट्र शासनाने समस्त शेतकरी समाजाचा यथोचित गौरव केलेला आहे. हा पुरस्कार माननीय राज्यपालाच्या हस्ते राजभवनात १३ जुलै २००१ रोजी संस्थेचे चेअरमन ॲड. नारायणराव ओले पाटील यांना प्रदान करण्यात आला. डॉ. पंजाबरावांचे १९९८-९९ साली संपूर्ण भारतभर जन्मशताब्दी वर्ष साजरे होत असतानाच महाराष्ट्र राज्य कृषक समाजास स्व. वसंतराव नाईक प्रतिष्ठानतर्फे बांधव तसेच महाराष्ट्र राज्य कृषक समाजाच्या कार्यकारिणी मंडळाच्या अथक प्रयत्नामुळे कृषक समाजाला हे वैभव प्राप्त झाले असून जगाचा पोशिंदा असलेल्या शेतकरी राजास सन्मानाने जगता यावे, त्याची भरभराट व्हावी व आपला देश मसुजलाम सुफलामफ व्हावा या डॉ. पंजाबरावांच्या स्वप्नांची पूर्तता या पुरस्कारांमुळे होत आहे. अशा या महामानवाला, भारतरत्नाला, कर्ममहर्षीला आणि भारतीय शेतीला आधुनिकीकरणाचा साज चढविणाऱ्या महान शिल्पकाराला भारत कृषक समाजाच्या ६८ व्या वर्धापन दिनानिमित्ताने समस्त शेतकरी बांधवांतर्फे कोटी कोटी प्रणाम.

**प्रा. प्रकाश घवघवे**

# नागरिकांची कामे निर्धारित वेळेत पूर्ण करा-पालकमंत्री




## पं.स.अर्जुनी/मोरगाव येथील नविन प्रशासकीय इमारतीचे उद्घाटन

**गोंदिया :** अर्जुनी मोरगाव तालुका दुर्गम, नक्षलग्रस्त व संवेदनशिल आहे. हा तालुका आदिवासी बहुल असून जास्तीत जास्त नागरिक अतिदुर्गम भागात वास्तव्यास राहून शेती करतात. त्यांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ प्रदान करण्याच्या दृष्टीने नागरिकांची फारच गैरसोय होत होती. त्यामुळे पंचायत समिती इमारतीचे बांधकाम करणे फारच गरजेचे होते. आज विधीवत सदर इमारतीचे लोकार्पण करण्यात आले असून या इमारतीच्या माध्यमातून नागरिकांची कामे निर्धारित वेळेत पूर्ण झाली पाहिजे, असे प्रतिपादन अन्न व औषध प्रशासन मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री धर्मरावबाबा आत्राम यांनी केले.

पंचायत समिती अर्जुनी मोरगाव येथे आयोजित पं.स.नविन प्रशासकीय इमारतीचे उद्घाटन करतांना श्री. आत्राम बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पं.स.अर्जुनी मोरगाव सभापती सविता कोडापे हया होत्या. आमदार मनोहर चंद्रिकापुरे, जि.प.उपाध्यक्ष यशवंत गणवीर, मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल पाटील, उपविभागीय अधिकारी वरुणकुमार सहारे, उपविभागीय पोलीस अधिकारी संकेत देवळेकर, तहसिलदार अनिरुध्द कांबळे, जि.प.कार्यकारी अभियंता अतुलकुमार मेश्राम, गटशिक्षणाधिकारी ऋषी मांढरे, महिला व बालकल्याण अधिकारी प्रियंका किरणापुरे, पं.स. अर्जुनी मोरगाव उपसभापती होमराज पुस्तोडे यांची यावेळी प्रामुख्याने उपस्थिती होती.

पालकमंत्री श्री. आत्राम म्हणाले, गोंदिया जिल्हा हा जंगलव्याप्त जिल्हा आहे. महाराष्ट्राच्या पूर्व टोकावर असलेल्या पंचायत समिती अर्जुनी मोरगाव ची स्थापना सन १९६२ मध्ये झाली. सदर तालुक्यातील नागरिकांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ प्रदान करण्याच्या दृष्टीने पंचायत समितीचे जुन्या इमारतीमध्ये फारच कमी विभागांची सोय उपलब्ध होती. काही विभाग इतरत्र विखुरलेल्या इमारतींमध्ये कार्यान्वित करण्यात आले होते. त्यामुळे नागरिकांची व प्रशासनाची सुध्दा गैरसोय होत होती. नागरिकांची व प्रशासनाची गैरसोय टाळण्याच्या दृष्टीने नविन प्रशासकीय इमारत बांधकामास सन २०१९ मध्ये मंजूरी प्रदान करण्यात आली. सदर इमारतीचे बांधकामास ३ कोटी ७० लक्ष रुपये मंजूर करण्यात येवून सन २०२४ पर्यंत सदर इमारतीचे बांधकाम पूर्ण करुन आज २५ जानेवारी रोजी या इमारतीचे लोकार्पण करुन नागरिकांच्या सेवेत रुजू करण्यात आले आहे.

पं.स.अर्जुनी मोरगाव च्या नविन प्रशासकीय इमारतीमधून विविध विभागांतर्गत राबविण्यात येणाऱ्या लोकोपयोगी योजनांचा एकाच ठिकाणावरुन लाभ देण्यात येणार असल्यामुळे आता नागरिकांना सोईचे झाले आहे. कामे करायला भरपूर संधी आहे. गोंदिया जिल्ह्याचा सर्वांगिण विकास करण्यासाठी जिल्हा नियोजन समितीमध्ये निधी वाढवून देण्यास आपण प्रयत्नशील आहोत. राज्य सरकारने महिलांना एसटी प्रवासात ५० टक्के सवलत दिली आहे. महिलांचे सशक्तीकरण करण्याचे महाराष्ट्र शासनाने चांगला निर्णय घेतला आहे. पुवी पं.स.इमारतीत अधिकारी व कर्मचाऱ्यांना बसण्याची व्यवस्था नव्हती, आता पंचायत समितीच्या नविन इमारतीच्या माध्यमातून अधिकारी व कर्मचाऱ्यांची ही गैरसोय दूर झालेली आहे.

सदर पं.स.इमारतीतून नागरिकांची कामे प्रामाणिकपणे करा. काम करीत असतांना अनुभव लागतो, त्यासाठी आपली इच्छाशक्ती असली पाहिजे. जिल्ह्यातील शेतकऱ्यांची विजेची समस्या आहे. ८ तासावरुन १२ तास वीज उपलब्ध करुन देण्यासाठी तसेच जिल्ह्यातील शिक्षण विभाग व आरोग्य विभागातील रिक्त पदे भरण्यासाठी त्याचप्रमाणे जिल्ह्याच्या बळकटीकरणासाठी इको टुरिझम वाढविण्यासाठी आपण शासन स्तरावर प्रयत्न करणार अशी ग्वाही यावेळी पालकमंत्र्यांनी दिली.

आमदार श्री. चंद्रिकापुरे म्हणाले, आज खऱ्या अर्थाने ७५ वर्षांच्या कालखंडात अर्जुनी मोरगाव येथे पंचायत समितीच्या नविन इमारतीचे उद्घाटन करुन लोकार्पण करण्यात आले, ही आनंदाची बाब आहे. प्रशासनातील अडचणींवर मात करुन प्रत्येकाने कुशल कामे करुन आपल्या गावाचा सर्वांगिण विकास केला पाहिजे. खंड विकास अधिकाऱ्यांनी याकडे विशेष लक्ष दयावे. विकासाचा ध्यास समोर ठेवून प्रशासनातील अधिकाऱ्यांनी कामे करावीत. शासन व प्रशासनाने आपसात समन्वय ठेवून कामे केली तर जिल्ह्यातील प्रत्येक गावाचा विकास होईल. शेतकऱ्यांचे प्रश्न, शेतमजुरांचे प्रश्न, बेरोजगार युवकांचे ज्वलंत प्रश्न आहेत. त्यांच्या प्रश्नाचे निराकरण करण्यासाठी आपण शासन स्तरावर प्रयत्न करु असे त्यांनी यावेळी आश्वासित केले.

यशवंत गणवीर म्हणाले, गोंदिया जिल्हा हा दुर्गम व आदिवासी जिल्हा आहे. झाशीनगर या दुर्गम भागातील शेतकऱ्यांसाठी सिंचनाची व्यवस्था करण्यात यावी. जिल्ह्यात प्रतापगड व कचारगड सारखे पर्यटन स्थळ असून ईको टुरिझमच्या माध्यमातून पर्यटनाला वाव देण्यात यावा. जिल्ह्यात शिक्षण व आरोग्याच्या दृष्टीने रिक्त असलेली पदे भरण्यासाठी पालकमंत्री महोदयांनी शासन स्तरावर प्रयत्न करावे अशी अपेक्षा त्यांनी यावेळी व्यक्त केली. अनिल पाटील म्हणाले, लोकांची कामे कशी होतील याकडे प्रशासनाने लक्ष देणे गरजेचे आहे. आपल्याकडे कामासाठी आलेल्या प्रत्येक नागरिकांचा सन्मान करुन लोकांना न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न करावा.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरुन बोलतांना सविता कोडापे म्हणाल्या, पं.स.अर्जुनी मोरगाव च्या इमारतीमधून नागरिकांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ देण्याचा प्रयत्न करावा. या तालुक्यातील शिक्षण विभागातील शिक्षकांची पदे रिक्त असल्यामुळे ती पदे भरण्यात यावी व विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा मार्ग प्रशस्त करावा अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक गट विकास अधिकारी अर्जुनी मोरगाव विलास निमजे यांनी केले. कार्यक्रमास जि.प.सदस्य जयश्री देशमुख, सरपंच खोडशिवनी गंगाधर परशुरामकर, माजी जि.प.अध्यक्ष चंद्रशेखर ठवरे, केवळराम पुस्तोडे, लायकराम भेंडारकर, पोर्णिमा ढेंगे, कविता घाटबांधे, नाजुक कुमरे, नुतन सोनवाने, दानेश साखरे यांच्यासह अर्जुनी मोरगाव तालुक्यातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थितांचे आभार विस्तार अधिकारी पं.स.अर्जुनी मोरगाव अनिल चव्हाण यांनी मानले.




## १०० शेतकरी मुरघास निर्मितीतून घेणार लाख रुपयांचे उत्पादन- अदानी फाउंडेशनचा पुढाकार

**गोंदिया:-** अदानी फाउंडेशन तिरोडा शेतकऱ्यांचे आर्थिक उत्पन्न वाढावे व त्यांचा राहणीमानाचा दर्जा सुधारावा यासाठी वेगवेगळ्या कार्यक्रमाच्या माध्यमातून नेहमीच प्रयत्न करत असते यावषी सुद्धा पारंपारिक पिकाला बगल देत १०० शेतकऱ्यांना मका लागवडीसाठी सहाय्य करून त्यापासून मूरघास निर्मिती कशी करावी याचे प्रशिक्षण दिले.

त्यामुळे तालुक्यातील १०० शेतकऱ्यांनी १०० एकर शेतीमध्ये मका लागवड केली आहे व आता मका कापणीला आला असून त्यापासून जनावरांसाठी पौष्टिक असलेले मुरघास निर्मिती करण्यात येणार आहे.

सरासरी १ एकर शेतीमध्ये २० टन मुरघास तयार होईल असा विश्वास शेतकऱ्यांनी व्यक्त केला आहे.सोबतच तयार केलेला मुरघास विक्रीची सुद्धा सोय अदानी फाउंडेशन तिरोडा द्वारा करून देण्यात आली आहे.



पीक पद्धतीत बदल केल्यामुळे शेतीची उत्पादन क्षमता सुद्धा वाढण्यास मदत होईल व त्यासोबतच मका लागवडीसाठी उत्पादन खर्च कमी होत असल्यामुळे भविष्यात जास्तीत जास्त शेतकरी मका लागवडीकडे वळतील असे मत अदानी फाउंडेशन प्रमुख बिमुल पटेल यांनी व्यक्त केले तर अदानी फाउंडेशन चे कार्यक्रम ाधिकारी कैलास रेवतकर यांनी मका या पिकापासून बनविलेला मुरघास हा जनावरांसाठी पौष्टिक असल्यामुळे शेतकऱ्यांना दुग्ध उत्पादन वाढीसाठी सुद्धा मदत करेल असे सांगितले.

## शबरी घरकुल योजनेकरीता (शहरी क्षेत्र) प्रस्ताव आमंत्रित

**गोंदिया:** एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, देवरी अंतर्गत महाराष्ट्र शासन, आदिवासी विकास विभाग यांचे शासन निर्णयानुसार शबरी आदिवासी घरकुल योजना सन २०२३-२४ या वित्तीय वर्षात ग्रामीण क्षेत्राकरीता एकूण १५०० चे उद्दिष्ट प्राप्त झाले होते. आदिवासी लाभार्थ्यांचे अर्जाचे प्रस्ताव जास्त प्रमाणात कार्यालयात प्राप्त झाले असल्याने प्रकल्प अधिकारी यांनी शासनाला सन २०२३-२४ करीता वाढीव ५०० उद्दिष्टांची मागणी पाठपुरावा करुन शासन स्तरावर केले आहे.यापुर्वी शबरी योजनेचा लाभ ग्रामीण भागातील अनुसूचित जमातीच्या लाभार्थ्यांनाच मिळत होता. आता महाराष्ट्र शासनाने आदिवासी विकास विभागाचे ११ जानेवारी २०२४ चे शासन निर्णयनुसार नगरपरिषद/ नगरपंचायत (शहरी क्षेत्र) मध्ये कुडामातीच्या, झोपड्या, कच्चे घरात वास्तव्य करणाऱ्या आदिवासी कुटूंबांना शहरी घरकुल योजनेचा लाभ देण्याचे घोषित केले आहे.

## ठाणेदार कदम यांच्यासह पाच पोलिस कर्मचाऱ्यांचा सत्कार

**अर्जुनी मोरगाव:** तालुक्यातील अतिदुर्गम, आदिवासी व नक्षलप्रभावीत क्षेत्रात केशोरी पोलिस राबविलेल्या लोकयुक्त उपक्रमाची दखल घेत ठाणेदार सोमनाथ कदम यांच्यासह पाच पोलिस कर्मचाऱ्यांचा पालकमंत्री यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

जिल्हा पोलिस अधीक्षकांच्या मार्गदर्शनाखाली ठाणेदार कदम व त्यांच्या अधिनस्त कर्मचाऱ्यांनी कम्युनिटी पोलिसिंग, दादालोरा खिडकी योजनेच्या माध्यमातून आदिवासी व नक्षलग्रस्त क्षेत्रात अनेक लोकोपयोगी व शासनाचे उपक्रम राबविले. याचा स्थानिक नागरिकांचा मोठा उपक्रम होत आहे.

याची दखल घेत गोंदिया पोलिस मुख्यालयात प्रजासत्ताक दिनी ठाणेदार कदम यांच्यासह पोलिस उपनिरीक्षक प्रताप बाजड, पोलिस हवालदार सुशिल रामटेके, मपोहवा. पूनम हरिणखेडे, पोलिस नायक राहुल चिचमलकर यांचा सत्कार करण्यात आला.

## परशुराम विद्यालयात माजी विद्यार्थी असलेल्या सैनिकाच्या हस्ते ध्वजारोहण



**गोरेगाव-** तालुक्यातील परशुराम विद्यालय मोहगाव ( बु.) येथे ७५ वा गणतंत्र दिवस उत्साहात साजरा करण्यात आला. या प्रसंगी गांवचे सरपंच, उपसरपंच व तं.मुक्त समिति अध्यक्ष तसेच शाळेचे सेवानीवृत मुख्याध्यापक बी.डब्लू कटरे गावातील प्रतिष्ठित नागरिक व माजी विद्यार्थी उपस्थित होते.यावेळी शाळेचे माजी विद्याथी व भारतीय सैन्य दलातील सैनिक विजय उपवंशी यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

तदनंतर विविध कार्यक्रम व आंतरशालेय स्पर्धेचे बक्षीस वितरण उपस्थित पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आले.बक्षीस वितरण कार्यक्रमाप्रसंगी डॉ.निखिल नागपुरे,आकाश बावनथडे,आशिष कटरे सर्व माजी विद्यार्थी यांनी विधार्थ्यांना मार्गदर्शन केले.व प्रमाणपत्र तसेच मेडल्स प्रदान करुन सत्कार करण्यात आला. या प्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक ,तसेच सर्व शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन व्हि.एस.मेश्राम ,आभार प्रदर्शन टि.एफ.इळपाचे यांनी केले.वंदे मातरम गीताने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.


**विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपुर**

**(महाराष्ट्र शासनाचा अंगिकृत उपक्रम)**

## कार्यकारी अभियंता, बाघ इटियाडोह पाटबंधारे विभाग, गोंदिया

**अधिक्षक अभियंता, भंडारा सिंचन मंडळ, भंडारा**

### निविदा सुचना क्र. ४ सन २०२३-२४ (ऑफलाईन)

कार्यकारी अभियंता, बाघ इटियाडोह पाटबंधारे विभाग, गोंदिया खालील कामाकरिता सक्षम असलेल्या कंत्राटदारा कडुन ब-१ नमुन्या तील निविदा, प्रणाली (ऑफलाईन) निविदा मागवत आहेत. निविदा कागदपत्र कार्यकारी अभियंता, बाघ इटियाडोह पाटबंधारे विभाग, गोंदिया येथे उपलब्ध असणार आहेत. तसेच स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता यांनी राखुन ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ.क्र | कामाचे नाव | कामाची एकुण अंदाजित किंमत (लक्ष) | इसारा/ बयाना रक्कम (लक्ष) | काम पुर्ण करण्याचा (कालावधी) | ई- निविदा संचाची किंमत | कंत्राटदाराचे वर्ग | पात्रता |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | कालीसरार धरणाचे उंची वाढवीण्याचे सर्वक्षण, अंदाजपत्रक तयार करणे. | १६७०७५/ | २०००/- | ६ महिने | रु. १०००/- + जिएसटी १८०/- एकुण ११८०/- | नोंदणीकृत कंत्राटदार करिता (खुला) | महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभागकडे पंजीकृत नोंदणी वर्ग ९ व त्यावरील पात्र सर्व कंत्राटदार |
| २ | Right Side Key wall repaire of Kalisarar Project | ८४०१८२/- | ९०००/- | ६ महिने | रु. १०००/- + जिएसटी १८०/- एकुण ११८०/- | नोंदणीकृत कंत्राटदार करिता (खुला) | महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभागकडे पंजीकृत नोंदणी वर्ग ७ व त्यावरील पात्र सर्व कंत्राटदार |
| ३ | बाघ प्रकल्पावरील विशेष दुरुस्तीच्या कामांचे अंदाजपत्रक तयार करणे. | २५०२७८/- | ३०००/- | ६ महिने | रु. १०००/- + जिएसटी १८०/- एकुण ११८०/- | नोंदणीकृत कंत्राटदार करिता (खुला) | महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभागकडे पंजीकृत नोंदणी वर्ग ९ व त्यावरील पात्र सर्व कंत्राटदार |
| ४ | बाघ इटियाडोह पाटबंधारे विभागीय कार्यालय दुसर्या इमारतीमध्ये कार्यालय हालविणे. | ४१२९२८/- | ५०००/- | ६ महिने | रु. १०००/- + जिएसटी १८०/- एकुण ११८०/- | नोंदणीकृत कंत्राटदार करिता (खुला) | महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभागकडे पंजीकृत नोंदणी वर्ग ८ व त्यावरील पात्र सर्व कंत्राटदार |
| ५ | बाघ इटियाडोह पाटबंधारे विभागीय कार्यालयास बाहयंत्रणेव्दारे वाहन पुरविणे. | १६२०००/- | २०००/- | ६ महिने | रु. १०००/- + जिएसटी १८०/- एकुण ११८०/- | नोंदणीकृत कंत्राटदार करिता (खुला) | महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभागकडे पंजीकृत नोंदणी वर्ग ९ व त्यावरील पात्र सर्व कंत्राटदार |
| ६ | पूर नियंत्रण करण्याकरीता सिरपुर, कालीसरार व पुजारीटोला धरण मध्ये Mechanic Electrician व मजुर लावण्याचे काम | ८३३००४/- | ९०००/- | ६ महिने | रु. १०००/- + जिएसटी १८०/- एकुण ११८०/- | नोंदणीकृत कंत्राटदार करिता (खुला) | महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभागकडे पंजीकृत नोंदणी वर्ग ७ व त्यावरील पात्र सर्व कंत्राटदार |
| ७ | बाघ इटियाडोह पाटबंधारे विभाग गोंदिया व उपविभाग आमगाव, गोंदिया, अर्जुनी मोर व वडसा या कार्यालयात कंत्राटी पध्दतीने वाहन चालक पुरविण्याचे काम | ८४०१५७/- | ९०००/- | ६ महिने | रु. १०००/- + जिएसटी १८०/- एकुण ११८०/- | नोंदणीकृत कंत्राटदार करिता (खुला) | महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभागकडे पंजीकृत नोंदणी वर्ग ७ व त्यावरील पात्र सर्व कंत्राटदार |

अ) निविदा विक्री कालावधी :- दिनांक ०१/२/२०२४ वेळ १०.०० ते दिनांक १२/०२/२०२४ वेळ १५.०० वाजेपर्यंत
आ) निविदा सादरीकरण कालावधी:- दिनांक ०१/२/२०२४ वेळ १०.०० ते दिनांक १४/०२/२०२४ वेळ १५.०० वाजेपर्यंत
इ) निविदा उघडणे :- दिनांक १४/०२/२०२४ ला दुपारी १६.०० वाजता
ई) Geo Tagging दिनांक ०५/०२/२०२४ ते दि. ०९/०२/२०२४ वेळ १७.४५ वाजे पर्यंत

**टिप:- अ.क्र. १ ते ७ ची निविदा नोंदणीकृत कंत्राटदार खुला करिता राखीव आहेत.**

(सदर निविदे सुचने मध्ये काही बदल होत असल्यास कार्यालयीन नोटीस बोर्डवर कळविण्यात येईल)

१) कार्यकारी अभियंता कार्यालयातुन निविदा कोरी प्रपत्रे विकली जाणार आहेत.
२) सविस्तर निविदा सुचना कार्यकारी अभियंता, बाघ इटियाडोह पाटबंधारे विभाग, गोंदिया कार्यालयातील नोटीस बोर्डावर पहावयास मिळेल.
३) या कामाचे अंदाजपत्र क, दर विश्लेशन, मोजमापे, नकाशे इत्यादी कार्यकारी अभियंता कार्यालयात उपलब्ध आहेत.
४) सदर निविदे मध्ये कोणतेही बदल करण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता यांच्याकडे राहील.

**सहपत्र :-.**

**स्वा/-**
**कार्यकारी अभियंता**
**बाघ ईटियाडोह पाटबंधारे विभाग,**
**गोंदिया**

# जिल्ह्याच्या सर्वांगिण विकासासाठी शासन कटिबद्ध-पालकमंत्री धर्मरावबाबा आत्राम

**गोंदिया :** समृद्ध भारत, विकसित भारत हे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचे स्वप्न आहे. यासाठी ते सातत्याने प्रयत्न करत आहेत तसा संकल्पही त्यांनी केला आहे. विकसित भारताचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी महाराष्ट्र सदैव प्रयत्नशील आहे. प्रधानमंत्र्यांचा संकल्प पूर्ण करण्यासाठी महाराष्ट्र पूर्ण योगदान देईल अशी ग्वाही देतांनाच आपला महाराष्ट्र विकासाच्या दृष्टीने देशात अव्वल व गोंदिया जिल्हा राज्यात अव्वल राहील यासाठी कटिबद्ध होऊ या असे प्रतिपादन राज्याचे अन्न व औषध प्रशासन मंत्री तथा गोंदिया जिल्ह्याचे पालकमंत्री धर्मरावबाबा आत्राम यांनी केले. पोलीस मुख्यालय मैदान कारंजा गोंदिया येथे आयोजित ७४ व्या प्रजासत्ताक दिनी पालकमंत्र्यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले, त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी जि.प.अध्यक्ष पंकज रहांगडाले, अर्थ व बांधकाम सभापती योपेंद्रसिंह टेंभरे, समाज कल्याण सभापती पुजा सेठ, जिल्हाधिकारी चिन्मय गोतमारे, जि.प.मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल पाटील, जिल्हा पोलीस अधीक्षक निखिल पिंगळे, निवासी उपजिल्हाधिकारी स्मिता बेलपत्रे उपस्थित होते.

केंद्र सरकारने आदिवासी समाज बांधवाच्या सर्वांगीण विकासासाठी साडेचार हजार कोटी रुपये निधीची तरतूद केली असून पहिला हप्ता वितरित केला आहे. या निधीतून आदिवासी समाजाची उन्नती होईल व समाज विकासाच्या मुख्य प्रवाहात येईल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या नेतृत्वाखालील महायुती सरकारने आदिवासी भागासाठी भगवान बिरसा मुंडा जोडरस्ते योजना तयार करून त्यासाठी पाच हजार कोटी रुपयांची तरतूद केली आहे. या योजनेत ग्रामीण आदिवासी भागात रस्त्याचे जाळे तयार होणार आहे. या योजनेचा गोंदिया जिल्ह्याला मोठ्या प्रमाणात लाभ होणार आहे. गोंदिया गडचिरोली समृद्धी महामार्गाचा विस्तार गोंदिया गडचिरोली पर्यंत करण्याचा महत्वपुर्ण निर्णयही महायुती सरकारने घेतला आहे. या निर्णयामुळे राज्याच्या एका टोकावर असलेल्या आदिवासी बहुल व नक्षल प्रभावीत जिल्ह्याचा गतीने विकास होणार आहे. समृद्धी महामार्गामुळे गोंदिया जिल्हा विकासाच्या दृष्टीने समृद्ध होईल अशी खात्री श्री. आत्राम यांनी व्यक्त केली.

गोंदिया येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयासाठी सहाशे कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला असून या कामाचे भूमिपूजन येत्या ९ फेब्रुवारी रोजी होणार असल्याचे पालकमंत्र्यांनी सांगितले.

जेव्हा-जेव्हा शेतकऱ्यांवर संकट आले, अवकाळी पाऊस, गारपीट आदीच्या वेळेस सरकारने शेतकऱ्यांना मोठी मदत केली आहे. सरकारने विक्रमी ४४ हजार कोटींची मदत गेल्या दीड वर्षांपासून शेती आणि शेतकऱ्यांसाठी केली आहे. धानाचा बोनस वाढवून हेक्टरी २० हजार रुपये केला. महिलांना एसटी प्रवासात ५० टक्के सवलत. शेतकऱ्यांना केवळ १ रुपयात



पीक विमा. महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेत आता ५ लाखांपर्यंत उपचार करता येणार आहे. दुधाला ५ रुपये प्रतीलिटर अनुदान, महिला सशक्तीकरण योजना इत्यादी लोककल्याणकारी निर्णय घेण्यात आले.

राज्यातील शेतकऱ्यांना २ लाख रुपयापर्यंतचे कर्ज माफ करणारी "महात्मा ज्योतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना' आपल्या जिल्ह्यात यशस्वीपणे राबविली आहे. या योजनेत २२ हजार ९७७ शेतकऱ्यांना ७३ कोटी ५२ लाख रुपयांचा लाभ देण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. जिल्हा पोलीस दल अत्यंत उत्कृष्ट काम करीत असून जिल्ह्यातील अतिदुर्गम नक्षलग्रस्त परिसरात विविध उपक्रम राबवून सामाजिक बांधिलकी पूर्ण करण्याच्या उद्देशाने "पोलीस दादालोरा खिडकी" हा स्तुत्य उपक्रम राबविला जात आहे. यासाठी पालकमंत्र्यांनी पोलीस अधीक्षक व पोलीस दलाचे कौतुक केले.

गोंदिया जिल्हा धान उत्पादक जिल्हा म्हणून प्रसिध्द आहे. जिल्ह्यात पणन हंगाम २०२३-२४ मध्ये जिल्ह्यात ८१ हजार ४०६ शेतकऱ्यांकडून २६ लक्ष ४१ हजार क्विंटल धान खरेदी करण्यात आला आहे. जिल्ह्यात आतापर्यंत ३४ हजार शेतकऱ्यांना २५३ कोटी ६३ लक्ष रुपये अदा करण्यात आले आहे. उर्वरित चुकारे लवकरच अदा केले जातील.

जास्तीत जास्त मजुरांना रोजगार उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत जिल्ह्यात सन २०२३-२४ मध्ये एकूण १७१ कोटी १२ लाख निधी खर्च झालेला असून त्यामधून ३८ लाख ५० हजार मनुष्य दिवस रोजगार निर्मिती झालेली आहे असे त्यांनी सांगितले.

गोंदिया येथील शासकीय तंत्रनिकेतन येथे जिल्हा वार्षिक योजनेमधून २० वर्ग खोल्यांचे डिजीटायजेशन करण्यात आले आहे. या अत्याधुनिकीकरणामुळे मुलांना उच्च दर्जाचे तंत्रशिक्षण घेणे सोपे झाले आहे. गोंदिया शासकीय तंत्रनिकेतन ही संपूर्ण डिजीटायजेशन झालेली राज्यातील पहिली संस्था आहे. याबद्दल संस्थेचे प्राचार्य, प्राध्यापक व विध्यार्थ्यांचे पालकमंत्र्यांनी अभिनंदन केले.

यासोबतच जिल्ह्यातील सर्व शासकीय विभागामार्फत सर्वसामान्यांच्या हिताचे निर्णय व लोककल्याणकारी योजनांची अंमलबजावणी करण्यात येत असल्याचे ते म्हणाले. यावेळी उत्कृष्ट कार्य करणाऱ्या अधिकारी-कर्मचाऱ्यांचा पालकमंर्त्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

प्रारंभी पालकमंत्री धर्मरावबाबा आत्राम यांनी ध्वजारोहण करुन परेडचे निरीक्षण केले. पोलीस दल, महिला पोलीस दल, होमगार्ड पोलीस, महिला होमगार्ड पोलीस, माजी सैनिक दल, फुलचूर हायस्कुल फुलचूर, मनोहर म्युन्सीपल हायस्कुल गोंदिया, बँड पथक, पोलीस श्वान पथक, रुग्णवाहिका, अग्नीशमन दल व शार्ट सर्कीट फायर पथक यांनी राष्ट्रध्वजाला मानवंदना दिली.

यावेळी भारत सरकारच्या तंबाखु व तंबाखुजन्य पदार्थ नियंत्रण कायदा २००३ तसेच ई-सिगारेट बंदीबाबतच्या १८ सप्टेंबर २०१९ च्या अध्यादेशाची प्रभावी अंमलबजावणी होण्याकरीता आज प्रजासत्ताक दिनानिमीत्त तंबाखु मुक्तीती शपथ घेण्यात आली.ध्वजारोहणानंतर पालकमंर्त्यांच्या हस्ते जिल्ह्यातील विविध क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी करणा?या अधिकारी व कर्मचा?यांचा प्रशस्तीपत्र देवून सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन मंजुश्री देशपांडे यांनी केले. कार्यक्रमास अपर पोलीस अधीक्षक नित्यानंद झा, उपजिल्हाधिकारी किरण अंबेकर, उपजिल्हाधिकारी चंद्रभान खंडाईत, उपविभागीय अधिकारी पर्वणी पाटील यांचेसह विविध विभागातील कार्यालय प्रमुख उपस्थित होते.

# मोदींशिवाय देशाला दुसरा पर्याय नाही : खा. प्रफुल्ल पटेल



**गोंदिया:** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात देशाची प्रगती होत आहे. गत दहा वर्षात त्यांनी उत्तम योजना राबविल्या. प्रत्येक घटकापर्यंत योजना पोहोचल्या. आज मोर्दीची जनतेत वेगळीच प्रतिमा आहे. त्यांच्या नेतृत्वात देश यशोशिखर गाठत आहे. विरोधकांकडे मुद्दे व अजेंडा नाही. त्यामुळे नरेंद्र मोदी यांच्याशिवाय देशाला दुसरा पर्याय नाही, असे मत राष्ट्रवादीचे नेते खा. प्रफुल्ल पटेल यांनी व्यक्त केले.

ते शनिवार २७ जानेवारी रोजी स्थानिक नटवरलाल माणिकलाल दलाल महाविद्यालयात राष्ट्रवादीच्या मेळावा प्रसंगी प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधींशी संवाद साधताना बोलत होते. पटेल पुढे म्हणाले, आपण जबाबदार नेते आहोत. भंडारा-गोंदिया लोकसभेच्या जागेबद्दल आता बोलणे सोयीस्कर होणार नाही. लवकरच महायुतीची बैठक होणार आहे. बैठकीत जागा वाटपासंदर्भात चर्चा होईल. त्यानंतरच राज्यातील जागा वाटपाचे चित्र स्पष्ट होणार असल्याचे पटेल यांनी सांगितले. येथील जनतेला माझ्या प्रती आपुलकी आहे, त्यांच्या अपेक्षाही असणे स्वाभाविक आहे. प्रत्येक पक्षाच्या कार्यकर्त्याला आपल्या नेत्याला तिकीट मिळावी ही अपेक्षा असतेच. विदर्भात भंडारा-गोंदिया लोकसभा क्षेत्रात राष्ट्रवादीची ताकद आहे. मात्र आपण या जागेवर दावा सांगू शकत नाही.

व्यक्तीशी टिकीट मागणार नाही, मात्र पक्षासाठी आग्रह मात्र करू शकतो असेही ते म्हणाले. मोर्दीना पर्याय असूच शकत नाही. मोदी ही व्यक्ती नसून एक विचार आहे. एक संकल्पना आहे. ही गोष्ट ज्यांना समजली, त्यांना मोदी समजले असे म्हणावे लागेल. आज देशातच काय विदेशातही मोदींचा डंका आहे. जनतेत त्यांच्या प्रति आकर्षण आहे. गतकाळात देशाने खूप प्रगती केली, त्यांच्यात सक्षम नेतृत्व व सर्वांना घेऊन सर्वांगीण विकास साधण्याची किमया असल्याचे त्यांनी सांगितले. आम्ही येत्या लोकसभा निवडणुकीत महायुतीच्या ४५ जागा जिंकू असा विश्वास त्यांनी यावेळी बोलून दाखविला. यावेळी आमदार मनोहर चंद्रीकापुरे, माजी आमदार राजेंद्र जैन यांच्यासह विविध प्रसार माध्यमांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

# रांका (अजित पवार गट) ओबीसी सेल जिल्हाध्यक्ष पदी किशोर तरोने



**अर्जुनी मोरगाव:** राष्ट्रवादी काँग्रेस महाराष्ट्र प्रदेशच्या अजित पवार गटाच्या वतीने नुकत्याच राज्य ते स्थानीक पातळीवरील विवीध विभागातील पक्षाच्या नियुक्त्या करून राज्यभर पक्ष संघटनेची पुनर्रचना करण्यात येत आहे. याचाच भाग म्हणून महाराष्ट्र प्रदेश ओबिसी सेल गोंदिया जिल्हाध्यक्ष पदी माजी युवक राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष तथा माजी जिल्हा परिषद सदस्य किशोर चिंतामण तरोणे यांची नियुक्ती करण्यात आली.

ओबीसी सेल राष्ट्रवादी प्रदेशाध्यक्ष कल्याण आखाडे यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा राष्ट्रीय कार्याध्यक्ष प्रफुल पटेल यांच्या नेतृत्वात राज्यात पक्ष बळकीकरणासाठी राष्ट्रवादी प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांच्या मान्यतेने त्यांची नियुक्त करीत असल्याचे पत्र प्रदेशाध्यक्ष कल्याण आखाडे यांनी (ता.२७) जाहीर केले.

पक्षाने सोपविलेली जबाबदारी प्रामाणिकपने पार पाडून तळागळातील ओबीसी समाजातील युवकांना पक्षाची विचारधारा समजावून ज्यास्तीत ज्यास्त युवकांना पक्षसंघटनेत सामावून घेतले जाईल. या माध्यमातून समाजाचे प्रश्न राज्य पातळीवर मांडून ते सोडविण्यासाठी प्रयत्नशील असल्याची प्रतिक्रीया नवनियुक्त जिल्हाध्यक्ष किशोर चिंतामण तरोने यांनी दिली. त्यांनी आपल्या निवडीचे श्रेय देशाचे नेते प्रफुल पटेल, राजेंद्र जैन गंगाधर परशुरामकर ईत्यादिना दिले आहे.

त्यांचे राष्ट्रवादी काँग्रेस गोंदिया जिल्ह्यातील नेते कार्यकर्ते तथा ओबीसी समाजातील युवक वर्गातून अभिनंदन करण्यात येत आहे.

# लोकशाही दिन ५ फेबुवारी रोजी

**गोंदिया :** जिल्ह्यात सर्वसामान्य जनतेसाठी दर महिन्याच्या पहिल्या सोमवारी लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येते. फेब्रुवारी महिन्यात पहिल्या सोमवारी दिनांक ५ फेब्रुवारी २०२४ रोजी सकाळी ११ वाजता लोकशाही दिनाचा कार्यक्रम जिल्हाधिकारी चिन्मय गोतमारे यांचे अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात आयोजित करण्यात आला आहे.

लोकशाही दिनानिमित्ताने जिल्हाधिकारी यांचेकडून जनतेच्या तक्रारी, अडचणी व गाऱ्हाणी ऐकून घेण्यात येतील आणि शासनाच्या विविध विभागाचे जिल्हा स्तरावरील प्रमुख अधिकारी यांना त्यासंबंधी कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात येतील. जिल्हाधिकारी कार्यालयात लोकशाही दिनानिमित्य या कार्यक्रमात ज्या नागरीकांनी १५ दिवसापूर्वी अर्ज सादर केलेले आहेत, त्यांनीच लोकशाही दिनात उपस्थित राहून आपल्या तक्रारी, अडचणी व गाऱ्हाणी सादर करावीत.

# गोंदिया-भंडारा जिल्ह्याच्या विकासासाठी सदैव कटिबद्ध-प्रफुल पटेल

**गोंदिया:** राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे युती जरी असले तरी पार्टीचे विचार, ध्येयधोरणांशी तडजोड केलेली नाही. भंडारा-गोंदिया लोकसभा क्षेत्रात सर्वांगिण विकास व्हावा, या क्षेत्रातील समस्या मार्गी लागाव्यात व मोघे प्रकल्प येऊन रोजगाराच्या संधी निर्माण व्हाव्यात यासाठी आपला सदैव प्रयत्न असणार आहे. शेतकऱ्यांच्या हितासाठी बोनस, दोन्ही जिल्ह्यातील शेती सुजलाम, सुफलाम व्हावी, सिंचनाचे प्रकल्प असो की अन्य कुठल्याही प्रकल्पात अडचण आल्यास आपण पुढाकार घेऊन ते मार्गी लावण्यासाठी कटिबद्ध असल्याची ग्वाही खा.प्रफुल्ल पटेल यांनी दिली.




गोंदिया जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा पक्ष पदाधिकारी व कार्यकर्ता मेळावा शनिवारी स्थानिक एन.एम.डी.महाविद्यालयाच्या सभागृहात पार पडला. यावेळी ते बोलत होते. यावेळी माजी आमदार राजेंद्र जैन, आमदार मनोहर चंद्रीकापुरे, महासचिव गंगाधर परशुरामकर व जिल्ह्यातील पदाधिकारी, तालुका व शहर अध्यक्ष, जि.प.सदस्य, पं.स.सदस्य, न.प.सदस्य, पक्ष पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. भंडारा-गोंदिया लोकसभा मतदारसंघातून महायुतीकडून उमेदवार कोण ही जागा कुणाच्या वाट्याला या सर्व गोष्टींवर अद्याप कुठलीही चर्चा झालेली नाही.

यासंदर्भात महायुतीत सहभागी घटक पक्षाच्या बैठकीत यासंदर्भातील निर्णय घेण्यात येईल. परंतु महायुतीच्या उमेदवारांसोबत राहून सर्वांनी महायुतीच्या उमेदवाराला साथ द्यायची आहे, असे खा. प्रफुल्ल पटेल यांनी सांगितले.

# जिल्हास्तरीय महिला रोजगार मेळावा १ फेब्रुवारीला

**गोंदिया :** जिल्ह्यातील युवतींना रोजगाराच्या संधी उपलब्ध होण्याच्या दृष्टीने जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र गोंदिया व शसकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था तिरोडा यांच्या संयुक्त विद्यमाने १ फेब्रुवारी २०२४ रोजी सकाळी ११.३० ते दुपारी ४ वाजेपर्यंत शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, तिरोडा येथे जिल्हास्तरीय महिला रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

महिला रोजगार मेळाव्यामध्ये विविध कंपन्यांचे उद्योजक सहभागी होणार आहेत. इच्छुक महिला उमेदवारांनी या जिल्हास्तरीय महिला रोजगार मेळाव्यामध्ये जास्तीत जास्त संख्येने सहभागी होण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे.

इयत्ता १० वी व १२ वी पास/नापास, आयटीआय, तसेच कोणत्याही शाखेचा पदवीधर अशा पात्रता असणा?या बेरोजगार उमेदवारांसाठी रोजगाराची सुवर्ण संधी आहे. उमेदवारांनी शैक्षणिक पात्रतेची गुणपत्रके, प्रमाणपत्रांची झेरॉक्स प्रत व जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, गोंदिया कार्यालयाचे नोंदणी कार्ड सोबत आणणे आवश्यक आहे.

# कृषी वीज पंपांना दिवसा १२ तास वीजपुरवठा होत नसल्याने शेतकरी बसले आमरण उपोषणाला

**अर्जुनी मोरगाव:-** यंदाच्या हिवाळी अधिवेशनात लक्षवेधी अंतर्गत लावण्यात आलेल्या प्रश्नाला उत्तर देताना राज्याचे ऊर्जामंत्री तथा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गोंदिया जिल्ह्यातील शेतकऱ्यांना दिवसा १२ तास वीजपुरवठा देण्याची घोषणा केली होती. त्यानुसार गोंदिया जिल्ह्यातील बहुतांश शेतकऱ्यांनी उन्हाळी पिकांची लागवड केली मात्र १ जानेवारी २०२४ रोजी काढलेल्या आदेशाने शेतकऱ्यांना रात्रीच्या सुमारास ८ तास वीजपुरवठा केला जात असल्याने संतप्त शेतक?यांनी रस्त्यावर टायर जाळून शासनाविरोधात रोष व्यक्त केला होता. तरीही दिवसा वीजपुरवठा होत नसल्याने संतप्त शेतकर्‍यांनी आमरण उपोषणाला सुरुवात केली आहे. हे उपोषण २८ जानेवारी रोजी सकाळी ११ वाजताच्या सुमारास गोंदिया जिल्ह्यातील अर्जुनी मोरगाव येथील लाखांदूर चौकात सुरू करण्यात आले आहे. या उपोषणात राष्ट्वादी काँग्रेस (शरद पवार गट) चे गोंदिया जिल्ह्याचे




कार्याध्यक्ष मिथुन मेश्राम यांच्या नेतृत्वात शेकडो शेतक?यांनी सहभाग नोंदविला आहे.

सविस्तर असे की, गोंदिया जिल्हा हा जंगलव्याप्त जिल्हा आहे. या भागातील बहुतांश शेतकऱ्यांची शेतजमीन जंगल परिसरात आहे. जिल्ह्यातील बहुतांश नागरिक शेतीवरच अवलंबून आहेत.

जिल्ह्यातील शेतकरी खरीप व उन्हाळी हंगामात धान पिकांची लागवड करतात. धान पिकाला सिंचनाची मोठ्या प्रमाणात आवश्यकता असते. शेतशिवारात सिंचन करण्यासाठी शेतकऱ्यांकडे कृषी वीज पंप आहेत मात्र कृषी वीज पंपांना रात्रीचे प्रहरी वीजपुरवठा होत असल्याने शेतकऱ्यांना जीव मुठीत घेऊन सिंचनासाठी शेतशिवारात जावे लागते.

रात्रीच्या सुमारास शेताशिवारात सिंचनासाठी गेलेल्या शेतकऱ्यांवर वन्य प्राण्यांनी हल्ला केल्याच्या घटना जिल्ह्यात घडल्या आहेत. त्यामुळे शरद पवार गटाचे गोंदिया जिल्ह्याचे कार्याध्यक्ष मिथुन मेश्राम यांनी अधिवेशनादरम्यान जयंत पाटील यांची भेट घेऊन शेतकऱ्यांची आपबीती सांगितली. यावरुन जयंत पाटील यांनी हिवाळी अधिवेशनात लक्षवेधी लावली होती. यावेळी महाराष्ट्र राज्याचे ऊर्जामंत्री तथा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिवसा १२ तास वीज पुरवठा देण्याची घोषणा केली असल्याची माहिती देण्यात आली.

घोषणेवरुन जिल्ह्यातील बहुतांश शेतकऱ्यांनी उन्हाळी धान पिकांची लागवड केली आणि १ जानेवारी २०२४ रोजी रात्री ८ तास वीजपुरवठा करण्याचे आदेश देण्यात आले. त्यावरुन संतप्त झालेल्या शेतकऱ्यांनी कार्याध्यक्ष मिथुन मेश्राम यांचे नेतृत्वात अर्जुनी मोरगाव येथील रस्त्यावर टायर जाळून शासनाविरोधात संताप व्यक्त केला होता व दिवसा विज पुरवठा न झाल्यास आमरण उपोषणाचा इशारा दिला होता. त्यानुसार २८ जानेवारी रोजी आमरण उपोषणाला सुरुवात करण्यात आली आहे.

गोंदिया जिल्ह्याचे शरद पवार गटाचे राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा कार्याध्यक्ष मिथुन मेश्राम यांचे नेतृत्वात अनिल लंजे, प्रविण लंजे, विवेक कापगते, सुरेश लंजे, राजेश लंजे, सुरेश खोब्रागडे, पवन नाकाडे, जितेंद्र तुमडाम, राहुल बोलके, राहुल भोयर, रमण परशुरामकर, मोरेश्वर लंजे, यशवंत भोवते यासह शेकडो शेतकरी आमरण उपोषणाला बसले आहेत.

# चिचगड तलाठी दंडाळेना हटविण्याची मागणी

**चिचगड:-** येथील तलाठी नितिलेश दंडाळे हे तीन ते चार महिन्यापासून तलाठी कार्यालयात येत नसल्यामुळे शेतकऱ्यांचे काम पूर्णपणे ठप्प झाले आहेत. त्यांना लागणारे सात बारा व ८(अ)हे कागदपत्रे न मिळाल्याने आता शेतीच्या हंगामात शेतमाल विक्रीसाठी सातबारा शिवाय सोसायटीला माल विकता येत नाही. त्यामुळे शेतकऱ्यांना खासगी व्यापाराला माल द्यावा लागला त्यामुळे शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले आहे.



ह्या नुकसानाला जबाबदार कोण असा प्रश्न आज जनतेने अधिकाऱ्याला विचारला. यापूर्वी चिचगडला प्रकाश चव्हाण हे तलाठी होते त्यांची बदली झाल्यानंतर दंडाळे हे तलाठी चिचगडला आले.आता दंडाळे यांच्या त्रासामुळे नागरिकांनी प्रकाश चव्हाण हे तलाठी आता सध्या बीजेपार येथे आहेत त्यांना पुन्हा चिचगडला परत आणावा अशी मागणी अप्पर तहसीलदार सौ.डेकाटे यांच्याकडे निवेदनातून परिसरातील शेतकऱ्यांनी केली आहे.

हे निवेदन सामाजिक कार्यकर्ता अनिल घोटे यांच्या मार्गदर्शनात देण्यात आले. यावेळी सावंत बापू राऊत, भाऊदास बिझंलेकर, मनोज चौधरी, प्रेमलाल चावर,अनिल घोटे,भीमराज तुरकर, पुनऊ मरई ,मकबुल शेख, शेख सब्बीर ,दशरथ मरई, नारद नाईक, पुनारद कुंजाम ,आणि असे अनेक परिसरातील नागरिक निवेदन देतेवेळी उपस्थित होते.

# पुरोगामी व समविचारी संघटनांनी एकत्र येऊन संविधानिक मुल्य रुजवावे-ॲड.खेडेकर




## मराठा सेवा संघ व समविचारी विविध वर्ग संघटनेची संवाद बैठक

**गोंदिया:** वर्तमान परिस्थितीत सर्वच पुरोगामी व समविचारी संघटनांनी एकत्रित होऊन संविधानिक रित्या सामाजिक, सांस्कृतीक, धार्मिक, आध्यात्मिक, राजकीय, शैक्षणिक जीवनातील समता समानता समन्याय स्वातंत्र्य बंधुता आणि एकात्मता शांतता निर्माण करण्यासाठी पुढाकार घेणे गरजेचे आहे. स्थानिक पातळीवर विविध वर्ग संघटनेचे मराठा सेवा संघ व ३३ कक्षासह जवळपास सर्वच चळवळीचे काम खूप मंदावले आहे. एवढेच नाही तर आपसातील संवाद कमी होत मतभेद वाढत आहेत. यामुळे पुरोगामी व समविचारी संघटनांनी एकत्र येऊन समाजात संविधानिक मुल्य रुजवावे असे आवाहन मराठा सेवा संघाचे संस्थापक अध्यक्ष ॲड.पुरुषोत्तम खेडेकर यांनी केले.

पुरोगामी समविचारी संघटनांची संयुक्त संवाद बैठक स्थानिक विश्रामगृहात आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत ते बोलर होते. संवाद बैठकीत प्रारंभी छायाचित्रासमोर दीप प्रजल्वन करण्यात आले. तर संविधान उद्देशिकेचे सामुहिक वाचन करुन जिजाऊ वंदन गीत सादर करण्यात आले. या बैठकीला मराघा सेवा संघ संस्थापक अध्यक्ष पुरुषोत्तम खेडेकर, माजी कार्याध्यक्ष प्रा. अर्जुन तनपुरे, चंद्रपूर जिल्हाध्यक्ष डॉ. दिलीप चौधरी, गोंदिया जिल्हाध्यक्ष सुनील तरोणे, संभाजी ब्रिगेड जिल्हाध्यक्ष क्रांती ब्राम्हणकर, जिजाऊ ब्रिगेड जिल्हाध्यक्ष सुनीता भेलावे, सर्वसमाज विचार मंच जिल्हाध्यक्ष प्रा. दिशा गेडाम यांच्यासह संविधान मैत्री संघाचे संयाचे अतुल सतदेवे, आदेश गणवीर, ओबीसी संघर्ष कृती समिती जिल्हाध्यक्ष बबलू कटरे, विजय बहेकार, प्रकाश धोटे, वसंत गवळी, सी.पी. बिसेन, भोजराज ठाकरे, एस.यु.वंजारी, मुस्लीम जमात संघटनतर्फे सईम कुरैशी, समीना खान, मोहसीन खान, अनुसूचित जमाती आदिवादी संघटनेर्फे नीलकंठ चीचाम, शशीकांत कोहळे, ओबीसी संघटनेचे सावन कटरे, खेमेंद्र कटरे, डॉ. संजीव रहांगडाले, कृष्णा ब्राम्हणकर आदि मान्यवर उपस्थित होते.

यावेळी संविधान गौरव स्पर्धा परीक्षेसाठी केंद्र उपलब्ध करुन सेवा देणाऱ्या शाळा प्रशासन व पर्यवेक्षक यांना पुरस्कृत करण्यात आले. बैठकीचे संचालन संविधान मैत्री संघाचे अतुल सतदेवे तर मराठा सेवा संघ जिल्हाध्यक्ष सुनील तरोणे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# बांबू व टिंबरसाठी डेपो पूर्ववर सुरु करा-जिल्हाधिकाऱ्यांना पत्र

**देवरी:** तालुक्यातील चिचगड येथील बांबू आणि टिंबर डिपो पाच वर्षापासून बंद आहे. यामुळे बांबू व टिंबरसाठी डेपो लवकरात लवकर सुरु करण्यात यावे, अशी मागणी पंचायत समिती सभापती अंबिका बंजार यांनी जिल्हाधिकाऱ्यांना पत्र देऊन केली आहे.

परिसरातील लोकांना शेतीसाठी आणि घर कामासाठी लागणारे बांबू, जलाऊ बिट्या आणि इमारतीला लागणारे लाकूड डिपोतून घेऊन यायचे पण आता डिपो बंद झाल्यामुळे चिचगड जंगल परिसरातील बास आणि टिंबरचा माल हा नवेगावबांध आणि डोंगरगाव डेपो येथे घेऊन जातात. त्यामुळे चिचगड परिसरातील गरजू लोकांना माल घेण्यासाठी नवेगाबबांध किंवा डोंगरगाव डेपो ठिकाणी जावे



लागते. समळ्या शेतकऱ्यांना जाऊन आणणे शक्य होत नाही. नवेगाव आणि डोंगरगाव डेपो हे चिचगड पासून जवळपास ४० किलोमीटर इतके लांब आहे. तसेच चिचगड हा मोठा परिसर असून ह्या परिसरात अनेक गावे येतात. त्यामुळे गावकऱ्यांना घर बांधकाम करताना लाकडाची गरज भासते. त्यामुळे लककरात लवकर बांबू आणि टिंबर डिपो सुरु करण्यात यावा अशी मागणी सभापती अंबिका बंजार यांनी जिल्हाधिकारी गोंदियामार्फत वनमंत्री, प्रधान मुख्य वनसंरक्षक, मुख्य वनसंरक्षक, उपवनसंरक्षक, प्रकाष्ठ निष्कासनन अधिकारी, नवेगावबांध वनपरिक्षेत्र अधिकारी चिचगड यांना निवेदानातून केली आहे.